





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २८.०५.२०२६ | अंक नं. ०४९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







# अहिल्यानगर विधानपरिषदेची निवडणूक काँग्रेस लढणार?

**करण ससाणे यांना तयारी करण्याचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचना**

नगर – विधानपरिषदेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने राज्यातील सर्व १७ जागा लढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार अहिल्यानगरची जागा काँग्रेसला मिळण्याची शक्यता असून, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी श्रीरामपूरचे माजी आमदार जयंतराव ससाणे यांचे चिरंजीव करण ससाणे यांना निवडणूक लढण्याबाबत तयारी करण्याचे आदेश दिले आहेत. तर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी अहिल्यानगरची जागा काँग्रेसने लढायची की राष्ट्रवादीने याबाबतचा निर्णय २९ मे रोजी होणार असल्याचे सांगितले.

मागील द्विवार्षिक निवडणुकीत अहिल्यानगरची जागा एकत्रित राष्ट्रवादीने लढली होती. मात्र, आता राष्ट्रवादीचे दोन तुकडे झाले असून, शरद पवार यांची आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी असे दोन पक्ष निर्माण झाले. अजित पवारांचा राष्ट्रवादी हा पक्ष भाजपसोबत आहे तर शरद पवारांची राष्ट्रवादी ही महाविकास आघाडीसोबत आहे. दरम्यान शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून विधानपरिषद निवडणूक लढण्यासाठी अद्याप कोणाचेही नाव पुढे आलेले नाही. ते प्राजक्त तनपुरेंच्या निर्णयाकडे डोळे लावून बसले आहेत.

दरम्यान अहिल्यानगरची जागा लढायची की नाही, उमेदवार द्यायचा की नाही, याचा निर्णय अद्याप राष्ट्रवादीकडून झालेला नाही, असे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दैनिक नवा मराठाशी बोलताना सांगितले. महाविकास आघाडीच्या बैठकीत २९ मे रोजी यावर निर्णय घेण्यात येईल, असेही ते म्हणाले.

मात्र, काँग्रेसने करण ससाणे यांना तयारी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ससाणे यांनी दोन अर्ज घेवून ठेवले आहेत. अर्ज भरण्याची सर्व प्रक्रिया ते पूर्ण करीत आहेत. पक्षाकडून आदेश आला की, १ जून रोजी ते अर्ज दाखल करणार आहेत, असे सुत्रांनी सांगितले. काँग्रेसची तयारी पाहता ही जागा काँग्रेसने आपल्याकडे घेण्याची पूर्ण तयारी केली असल्याचे दिसून येत आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या टिळक भवन कार्यालयात २७ मे रोजी झालेल्या बैठकीत अहिल्यानगरची जागा लढविण्याबाबत चर्चा झाल्याचे सांगण्यात येत आहे. महाविकास आघाडीतील जागा वाटपांचे सूत्रही ठरले आहे. जर तनपुरे भाजपकडे गेले तर अहिल्यानगरची जागा काँग्रेसला सोडली जाणार असल्याचे सुत्रांनी सांगितले. तनपुरेंचा निर्णय जाहीर होत नाही. त्यामुळे अहिल्यानगरच्या जागेचा निर्णय होऊ शकला नाही. आज उशिरापर्यंत किंवा उद्या हा निर्णय होऊ शकतो, असेही काँग्रेसमधील सुत्रांनी सांगितले.

दरम्यान भाजपकडून अद्याप कोणीही उमेदवारी अर्ज घेतलेला नाही. तनपुरे यांच्यासाठी अर्ज घेवून ठेवले आहेत. तनपुरे यांनीही उमेदवारी अर्ज भरण्याची सर्व तयारी पूर्ण केली आहे. मात्र, त्यांच्या उमेदवारीचा निर्णय होऊ शकलेला नाही. ते वरिष्ठांच्या निर्णयाकडे डोळे लावून बसले आहेत.

### सर्व काही ठरलेय.. आज निर्णय अपेक्षित

विधानपरिषद निवडणुकीत भाजपकडून प्राजक्त तनपुरे यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाली आहे. मात्र, भाजपकडून उमेदवारी जाहीर न करता तनपुरे यांना प्रतिक्षायादीत ठेवले आहे. मागील निवडणुकीत अहिल्यानगरच्या जागेवरुन स्व. अरुणकाका जगताप हे विजयी झाले होते. आता त्या जागेवर त्यांचे पूत्र सचिन जगताप हे इच्छूक आहेत. तर भाजपचे सर्वाधिक नगरसेवक असल्यामुळे ही जागा भाजपला मिळावी, यासाठी भाजप आग्रही आहे. त्यामुळे अहिल्यानगरच्या जागेचा तिढा सुटलेला नाही. पर्यायाने भाजपलाही तनपुरे यांची उमेदवारी जाहीर करता येत नाही, तनपुरे यांच्या निकटवर्तीयांकडून समजले. दरम्यान आज उशिरापर्यंत अहिल्यानगरच्या जागेचा निर्णय होऊ शकतो, असेही सांगण्यात आले.

### १७ वर्षांपूर्वीच्या घटनेला उजाळा

२००९ मध्ये झालेल्या विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारसंघात स्व. जयंतराव ससाणे आणि स्व. अरुणकाका जगताप यांच्यामध्ये लढत रंगली होती. त्यावेळी ही जागा काँग्रेसकडे होती. काँग्रेसचे सर्वाधिक मतदार होते. त्यामुळे ससाणे यांचा विजय निश्चित मानला जात होता. त्याचवेळी राष्ट्रवादीकडून स्व. अरुणकाका जगताप हे इच्छूक होते. मात्र, ही जागा काँग्रेसकडे असल्यामुळे राष्ट्रवादीने जगताप यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. त्यामुळे जगताप अपक्ष उभे राहिले होते. जगताप यांनी काँग्रेसचा एक गट फोडून तसेच राष्ट्रवादीचे सर्व मतदान आपल्या पदरात पाडून घेत विजय मिळविला होता आणि ससाणे यांना धक्कादायक पराभव स्वीकारावा लागला होता. यंदाच्या निवडणुकीत स्व. जयंतराव ससाणे यांचे पूत्र व श्रीरामपुरचे नगराध्यक्ष करण ससाणे आणि स्व. अरुणकाका जगताप यांचे पूत्र सचिन जगताप हे इच्छूक आहेत. दोघांनीही अर्ज घेतले आहे. त्यामुळे २००९ च्या निवडणुकीलाही उजाळा मिळाला.

# नगरमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस

## २८ मे ते १ जूनपर्यंत हवामान अस्थिर : विभागाचा अंदाज

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात पुढील काही दिवस हवामान अस्थिर राहण्याची शक्यता असून, हवामान विभागाने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी २८ मे रोजी विजांच्या कडकडाटासह वादळी वारा आणि पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात २८ ते १ जूनपर्यंत हवामान अस्थिर राहण्याची शक्यता आहे. २८ मे रोजी ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचे वारे वाहू शकतात आणि काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची तसेच विजांच्या कडकडाटासह वादळ आणि पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २९ मे रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता असून, ३० मे ते १ जूनपर्यंत रोजी वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपिट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मेघगर्जेनेसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस आणि वादळी वारे या काळात वाहू शकतात. तसेच विजांच्या कडकडाटाची दाट शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

### विधानपरिषदेसाठी इच्छुकांनी नेले अर्ज

नगर – विधान परिषदेसाठी काँग्रेसकडून करण ससाणे, राष्ट्रवादीकडून सचिन जगताप, गणेश भोसले यांनी अर्ज घेवून ठेवले आहेत.

याशिवाय दत्तात्रय म्हैस, चैतन्य राणे, विशाल कर्डिले, भाऊसाहेब शिंदे, सुधीर वैरागर, कमलेश गांधी, आशिष शेलार, संतोष चोळके, प्रिती सत्यजित कदम, मनिषा सुर्यकांत कदम, शिवाजी शिंदे, प्रवीण दळवी, अनिल तुपे, प्रविण लोखंडे, अंकुश काळे, ज्ञानदेव पाडळे यांनी उमेदवारी अर्ज घेवून ठेवले आहेत. आजपर्यंत एकूण २८ जणांनी अर्ज घेतले आहेत. मात्र, एकही अर्ज दाखल झालेला नाही. अर्ज दाखल करण्यासाठी आता २९, ३० मे आणि १ जून असे तीन दिवस उरले आहेत.






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# बंद घर फोडून चोरट्यांनी रोकड व दागिने पळविले; जामखेड रोडवरील 'आवारे टॉवर्स' मधील घटना

नगर - भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जामखेड रोड परिसरातील 'आवारे टॉवर्स'मध्ये घरफोडीची एक घटना समोर आली आहे. अज्ञात चोरट्यांनी बंद घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश करत सुमारे १ लाख २ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला आहे.

याबाबत मनिषा भारत सांगोलकर (वय ४६, रा. आवारे टॉवर्स, जामखेड रोड, ता. नगर) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या १९ मे रोजी रात्री १२ वाजेपासून ते २६ मे सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत घर बंद करून बाहेर गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घराचा कडी-कोयंडा आणि कुलूप तोडून घरात प्रवेश केला.

घरात शिरल्यावर चोरट्यांनी लॅपटॉप, चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण १ लाख २ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. घरी आल्यावर सांगोलकर यांना घरात चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी पोलिसांना याबाबत माहिती दिली. ही माहिती मिळताच स.पो.नि. जगदीश मुलगीर यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

या प्रकरणी सांगोलकर यांनी २७ मे रोजी सकाळी दिलेल्या फिर्यादी वरून भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३३१ (३), ३३१ (४) आणि ३०५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस हवालदार पठारे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# 'साईबाबा संस्थान'च्या नावे बनावट वेबसाईटद्वारे भाविकांची केली आर्थिक फसवणूक; गुन्हा दाखल

शिर्डी -साईबाबा संस्थानच्या नावे बनावट वेबसाईट तयार करून या माध्यमातून साईबाबा संस्थान आणि साईभक्तांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार शिर्डीत उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे साईभक्तांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये २७ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत साईबाबा संस्थान शिर्डीच्या माहिती तंत्रज्ञान विभागातील कर्मचारी रमेश चांगदेव पुजारी (वय ४८, रा. साई समर्थ नगर, पिंपळस, ता. राहाता) यांनी फिर्याद दिली आहे. अज्ञात आरोपींनी saiashrambhaktiniwashotelbooking.co.in' आणि 'saiashrambhaktaniwas.site' या नावाच्या दोन बनावट वेबसाईट तयार केल्या होत्या. वेबसाईटवर त्यांनी साईबाबा संस्थानच्या साईआश्रम भक्तनिवास इमारतींचे फोटो वापरून भाविकांना भुरळ घातली होती.

या बनावट वेबसाईटवर ९६६०३०९६७२, ७३७४८२३३१४ आणि ८७९६०२१७६६ यांसारखे मोबाईल क्रमांक देऊन भाविकांकडून बुकिंगच्या नावाखाली पैसे उकळले जात होते. या माध्यमातून साईबाबा संस्थान आणि साईभक्तांची फसवणूक करण्यात आल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले.

या प्रकरणी रमेश पुजारी यांनी दिलेल्या फिर्यादी वरून बनावट वेबसाईट तयार करणाऱ्या अज्ञात व्यक्तींच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१८(४) आणि ३३६(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शिर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक (सपोनि) वाळके करत आहेत. साईबाबा संस्थानच्या नावाचा गैरवापर करून सुरू असलेल्या या फसवणुकीच्या प्रकारामुळे भाविकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. मागील वर्षी सप्टेंबर २०२५ मध्ये ही असाच प्रकार घडला होता. त्यावेळी कर्नाटक राज्यातील कलबुर्गी येथील एका साईभक्ताची आर्थिक फसवणूक करण्यात आली होती.

साई बाबा संस्थान आणि शिर्डी पोलीस प्रशासनाने भक्तांना आवाहन केले आहे की, त्यांनी खोल्यांचे आरक्षण आणि देणगी केवळ संस्थेच्या अधिकृत वेबसाइट www.sai.org.in द्वारेच करावी किंवा साई संस्थानच्या अधिकृत संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा.

### शनि भक्तांपाठोपाठ साई भक्तांची फसवणूक

शनि शिंगणापूर येथील शनैश्वर देवस्थान च्या नावे बनावट ऑनलाइन ॲप तयार करून त्या माध्यमातून ऑनलाईन दर्शन पूजा, अभिषेक, तेल चढावा बुकिंग करीता शनैश्वर देवस्थान व धर्मदाय आयुक्त यांची कोणतीही परवानगी न घेता भाविकांकडून ऑनलाईन पद्धतीने अनियमित दराने रकमा स्वीकारल्याचे प्रकरण मागील वर्षी उघडकीस आले होते. हे प्रकरण विधानसभेत गाजले होते. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार पोलिसांनीच फिर्यादी होत गुन्हा दाखल केला होता. विशेष म्हणजे या घोटाळ्यात देवस्थानच्या कर्मचाऱ्यांचाच सहभाग उघड झाला होता. शनिभक्तांपाठोपाठ आता शिर्डीच्या साईबाबांच्या भक्तांची बनावट वेबसाईटद्वारे फसवणूक झाल्याचे समोर आले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील नोंदणीकृत न्यासांमधील प्राचीन हस्तलिखिते व ग्रंथांचे होणार डिजिटायझेशन

**'ज्ञान भारतम्' मोबाईल ॲपवर माहिती अपलोड करण्याचे धर्मादाय उपआयुक्त न. वा. जगताप यांचे आवाहन**

नगर - भारतीय ज्ञान परंपरेचा प्राचीन आणि समृद्ध वारसा जतन करण्यासाठी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालया अंतर्गत 'ज्ञान भारतम्' हा विशेष प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्त संस्थानी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले जुने ग्रंथ, हस्तलिखिते आणि शिलालेख यांचे सर्वेक्षण, संवर्धन व डिजिटायझेशन करण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन अहिल्यानगर जिल्ह्याचे धर्मादाय उपआयुक्त न. वा. जगताप यांनी जाहीर प्रकटनाद्वारे केले आहे.

भारत सरकारच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमामुळे मंदिरांमध्ये, मठांमध्ये किंवा जुन्या संस्थांकडे असणारा ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा डिजिटल स्वरूपात सुरक्षित केला जाणार आहे.

### 'Gyan Bharatam' ॲपवर करता येणार अपलोड

ज्या नोंदणीकृत न्यासांकडे (ट्रस्ट) जुनी हस्तलिखिते, दुर्मिळ ग्रंथ, शिलालेख किंवा ऐतिहासिक दस्तऐवज उपलब्ध आहेत, त्यांनी त्याची माहिती व फोटो केंद्र सरकारने तयार केलेल्या 'Gyan Bharatam' या अधिकृत मोबाईल ॲप्लिकेशनवर अपलोड करायचे आहेत.

या राष्ट्रीय कार्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील न्यासांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. आपल्याकडील प्राचीन ठेव्याची माहिती डिजिटल प्रणालीवर नोंदवून हा संवर्धन प्रकल्प यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, अशी विनंती सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाकडून करण्यात आली आहे.

## एकाच दिवशी दोन तरूणांच्या आत्महत्या

नगर - शहरातील वैदुवाडी परिसर व नगर तालुक्यातील हिवरेझरे शिवारात २६ मे रोजी दोन वेगवेगळ्या आत्महत्येच्या घटना उघडकीस आल्या असून, दोन्ही घटनांमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधितांनी राहत्या घरी गळफास घेतल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

पहिली घटना सावेडी परिसरातील वैदुवाडी येथे घडली. दत्तात्रय किसन बागडे (वय ३६) यांनी राहत्या घरी गळफास घेतल्याचे उघड झाले. नातेवाईकांनी त्यांना तातडीने सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मृत घोषित केले. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दुसरी घटना नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हिवरेझरे येथील काळेवाडी परिसरात घडली. अमोल वसंत काळे (वय ३०) यांनीही राहत्या घरी गळफास घेतल्याची घटना समोर आली. नातेवाईकांनी त्यांना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये आणले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट व सरचार्ज रद्द करा

**महागाईच्या संकटात जनतेला दिलासा द्यावा : खासदार नीलेश लंके यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी**



नगर - देशभरात वाढत चाललेल्या महागाईच्या पार्श्वभूमीवर पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांविरोधात खासदार नीलेश ज्ञानदेव लंके यांनी राज्य सरकारकडे आक्रमक भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र शासनाने पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट आणि सरचार्ज तात्काळ रद्द करावा, अशी मागणी खासदार लंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे. या निर्णयामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

खासदार लंके यांनी पत्रात म्हटले आहे की, आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे देशाच्या आर्थिक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला असून, त्याचा परिणाम थेट सर्वसामान्य जनतेवर होत आहे. खाद्यतेल, भाजीपाला, धान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यातच पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढून महागाई आणखी तीव्र होत आहे.

केंद्र सरकारकडून सातत्याने पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढवल्या जात असून, मागील दहा दिवसांत सलग चौथ्यांदा दरवाढ करण्यात आली आहे. पेट्रोलमध्ये २ रुपये ६१ पैसे, तर डिझेलमध्ये २ रुपये ७१ पैशांनी वाढ झाली असल्याचे खासदार लंके यांनी नमूद केले आहे. सध्या मुंबईमध्ये पेट्रोल १११.१२ रुपये प्रति लिटर, तर डिझेल ९६.८६ रुपये प्रति लिटर दराने उपलब्ध असल्याने सामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

राज्य सरकार पेट्रोलवर सुमारे २५ टक्के व्हॅट आणि १०.१२ रुपये प्रति लिटर सरचार्ज आकारत असल्याचे, तर डिझेलवर सुमारे २४ टक्के व्हॅट आणि ३ रुपये प्रति लिटर सरचार्ज आकारला जात असल्याचे लंके यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. हे कर आणि अधिभार रद्द करण्यात आल्यास पेट्रोल-डिझेलचे दर थेट ७० ते ८० रुपयांपर्यंत खाली येऊ शकतात, असा दावा त्यांनी केला आहे.

महागाईमुळे शेतकरी, कामगार, छोटे व्यावसायिक, वाहनधारक आणि मध्यमवर्गीय कुटुंबे मोठ्या आर्थिक संकटात सापडली आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकारने संवेदनशीलता दाखवत नागरिकांना तातडीने दिलासा देण्याची आवश्यकता असल्याचे खासदार लंके यांनी म्हटले आहे. राज्य सरकारने पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट आणि सरचार्ज रद्द करून सामान्य जनतेच्या हिताचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी विनंती खासदार नीलेश लंके यांनी केली आहे.


# दोन दुचाकींच्या अपघातात दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू

नगर - नगर तालुक्यातील पांगरमल-खोसपुरी रोडवर दोन दुचाकींची समोरासमोर धडक होवून झालेल्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून १ जण जखमी झाला आहे. राहुल राजू शिंदे (रा. वडगाव गुप्ता, ता.नगर) आणि आप्पा महादू वाघमोडे (आडगाव, ता. पाथर्डी) अशी मृतांची नावे आहेत. तर रोहन शिवाजी कुऱ्हाडे (रा.कॉटेज कॉर्नर, सावेडी) हा तरुण जखमी झाला आहे.

याबाबत रोहन कुऱ्हाडे याने एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्याचा मित्र राहुल शिंदे हे दोघे तरुण २० मे रोजी सकाळी ९ च्या सुमारास आपल्या दुचाकीवरून (क्र. एमएच.२० एचडी ११०६) पांगरमल शिवारातून जात असताना, समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या आप्पा महादू वाघमोडे यांच्या 'स्टार सिटी' (क्र. एमएच.१६ डीडी ५९८८) या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले असून शिंदे व वाघमोडे हे दोन्ही तरुण या अपघातास बळी पडले आहेत. तर फिर्यादी कुऱ्हाडे जखमी झाला. त्याने दिलेल्या फिर्यादी वरून एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## हाजी जाफर मुश्ताक हुसेन यांचे निधन

नगर - लालटाकी येथील हाजी जाफर मुश्ताक हुसेन (वय ८०) यांचे वृध्दापकाळाने नुकतेच निधन झाले. ते तांबटकर गल्ली येथे जुन्या काळातील फॅब्रिकेशनचे प्रसिध्द व्यावसायिक होते.



त्यांच्या पश्चात आठ मुली, दोन मुले, सुना, नातवंडे, पंतू असा परिवार आहे. माजी उपमहापौर हाजी नजीर हुसेन यांचे चुलते, ज्येष्ठ वृत्त छायाचित्रकार राजू शेख यांचे सासरे व नूर शेख वेल्डिंगवाले यांचे ते वडिल होते.

## विठ्ठल चिलका यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील रहिवासी विठ्ठल सुरेश चिलका (वय ५६, रा.सिमला कॉलनी, पंचवटीनगर) यांचे २७ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, पत्नी, २ भाऊ, भावजया, मुलगा असा परिवार आहे. संकेत चिलका यांचे ते वडील, देविदास, गणेश चिलका यांचे बंधू होत.



## दिपक दुग्गड यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर - येथील दिपक हुकुमचंद दुग्गड (वय ५६) यांचे अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन मुली, पुतणे, जावई असा परिवार आहे. राजेंद्र दुग्गड व तुषार दुग्गड यांचे ते थोरले बंधू, कु.देशना दुग्गड तसेच अहिल्यानगर येथील सौ.मोक्षदा रोहन भंडारी यांचे वडील होत.

# एक लाख रुपयांची लाच मागणाऱ्या पोलिस उपनिरीक्षकावर गुन्हा दाखल

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई, नाशिक येथून घेतले ताब्यात**

नगर - नगर तालुका पोलीस ठाण्यामध्ये दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी एक लाख रूपयांची लाच मागितल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक जयेश मोतीलाल गांगुर्डे यांच्याविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तोफखाना पोलीस ठाण्यात २७ मे रोजी गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने नाशिक येथून गांगुर्डे यांना ताब्यात घेतले असल्याचे पोलिस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांनी सांगितले. यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजू आल्हाट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. उपनिरीक्षक गांगुर्डे हे तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असून, त्यांनी एका गुन्ह्यात मदत करण्यासाठी सुरूवातीला दोन लाख रूपयांची मागणी केल्याचा आरोप आहे. त्यानंतर तडजोडीनंतर एक लाख रूपयांवर व्यवहार निश्चित करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारदार यांनी १८ मे रोजी तक्रार नोंदवली होती. तक्रारदाराच्या मामासह १५ जणांविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास उपनिरीक्षक गांगुर्डे यांच्याकडे होता. तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, संबंधित गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि आरोपींना सहकार्य करण्याच्या मोबदल्यात गांगुर्डे यांनी दोन लाख रूपयांची मागणी केली होती. तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी थेट लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे धाव घेतली. यानंतर पंचांसमक्ष येथील पोलीस मुख्यालयाच्या गेटवर पडताळणी कारवाई केली असता संबंधित गुन्ह्यात मदत करण्यासाठी गांगुर्डे यांनी तक्रारदाराकडे एक लाख रूपयांची लाच मागण्यात आल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी २७ मे रोजी गुन्हा नोंद करून गांगुर्डे यांना ताब्यात घेतले आहे.

### आठ दिवसांपूर्वीच मिळाली पदोन्नती

गेल्या आठ दिवसांपूर्वीच उपनिरीक्षक गांगुर्डे यांची सहायक पोलिस निरीक्षकपदी पदोन्नती झाली होती. त्याची बदली नाशिक येथे झाली आहे. दरम्यान, पदोन्नतीनंतर त्यांना कार्यमुक्त करण्यात आले नव्हते. येथील पोलीस मुख्यालयात सुरू असलेल्या प्रशिक्षणासाठी त्यांना पाठविण्यात आले होते. तेथे त्यांनी तक्रारदार यांच्याकडे लाच मागणी केली. दरम्यान, त्यांना २६ मे रोजी तालुका पोलीस ठाण्यातून कार्यमुक्त करण्यात आले आणि २७ मे रोजी त्यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मसाज पार्लर-स्पा सेंटरच्या नावाखाली नगर शहरामध्ये देहविक्रीचा व्यवसाय

**एएचटीयु पथकाने छापा टाकत ४ महिलांची केली सुटका, चौघांवर गुन्हा दाखल**

नगर -नगर-मनमाड रस्त्यालगत असलेल्या 'अँक्यूम मसाज पार्लर/स्पा सेंटर'वर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (एएचटीयु) छापा टाकून वेश्याव्यवसायाच्या अड्ड्याचा पर्दाफाश केला आहे. 'स्पा' सेंटरच्या नावाखाली महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून जबरदस्तीने देहविक्री करवून घेतली जात असल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चौघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून ४ महिलांची सुटका करण्यात आली आहे.

अनिकेत अशोक बचाटे (वय २७, रा. जिनती, कुंभारगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर), संतोष गणेश बघे (रा. छत्रपती संभाजीनगर), काळूराम भीमा समिंदर (रा.मांडवगण फराटा, ता.शिरूर), सजन एस (रा.केरळ) अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची नावे आहेत.

२७ मे रोजी रात्री ११.३५ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. मनमाड रस्त्यावरील अँक्यूम स्पा सेंटरमध्ये देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांना मिळाली होती. त्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कारवाईची योजना आखली. दोन सरकारी पंचांना सोबत घेऊन बनावट ग्राहक तयार करण्यात आला आणि त्याला स्पा सेंटरमध्ये पाठवण्यात आले. बनावट ग्राहकाने खात्री करून माहिती दिल्यानंतर स्पा सेंटरवर छापा टाकण्यात आला. यावेळी तेथे ५ रूम आढळून आल्या व त्यामध्ये ४ महिला आढळल्या. या ठिकाणाहून पथकाने रोख रक्कम व विविध मोबाईल असा ६० हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पिडीत महिलांची सुटका करत चौघा जणांच्या विरुद्ध महिला पो.हे.कॉ. अर्चना काळे यांच्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात बीएनएस १४३ (३) सह स्त्रीया व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ७, ८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पो.नि.बालाजी वैद्य, स.फौ. शकील शेख, महिला पो.हे.कॉ. अर्चना काळे, महिला पो.कॉ. छाया रांधवन, होमगार्ड सुभाष भांड, मयूर भट, शैलेश अढागळे, मंगेश अहिर तसेच तोफखाना पोलिस ठाण्याचे पो. नि. जगदीश भांबळ, नियंत्रण कक्षातील पोलिस उपनिरीक्षक तुषार धाकराव यांच्या पथकाने केली आहे. विशेष म्हणजे या 'अँक्यूम मसाज पार्लर/स्पा सेंटर'वर गेल्या ६ महिन्यातील ही दुसरी कारवाई आहे. यापूर्वी डिसेंबर २०२५ मध्येही अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने कारवाई करत गुन्हा दाखल केला होता.

# मोबाईलमध्ये शूटिंग काढल्याच्या कारणावरून दोघाभावांना दांडक्याने व दगडाने बेदम मारहाण

नगर - मोबाईलवर शूटिंग काढल्याच्या कारणावरून दोघा भावांना लाकडी दांडक्याने व दगडाने बेदम मारहाण केल्याची घटना नगर तालुक्यातील जेऊर बायजाबाई शिवारातील ससेमळा येथे २५ मे रोजी रात्री सव्वा आकरा वाजण्याच्या सुमारास घडली.

या मारहाणीत सूरज निवृत्ती ससे व त्यांचे बंधू प्रमोद निवृत्ती ससे (रा. ससे मळा, जेऊर बायजाबाई, ता. नगर) हे दोघे जखमी झाले आहेत. दोघे भाऊ त्यांच्या घरासमोर असताना तेथे संदीप पाराजी वाघ, मल्हारी सखाराम ससे, मल्हारी सखाराम ससे यांची पत्नी आणि संतोष रोहिदास ससे (सर्व रा. ससे मळा, ता. नगर) हे आले. त्यांनी आमची मोबाईलवर शूटिंग का काढली असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच, तुम्ही गावात कसे राहता तेच पाहतो अशी धमकी देत आरोपींनी दोघांना दगड आणि लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली.

या मारहाणीत दोघे भाऊ जखमी झाल्याने त्यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे पोलिसांना सुरज ससे यांनी दिलेल्या जबाबा वरून एमआयडीसी पोलिसांनी चौघांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११८(१), ११५ (२), ३५१, ३५२ आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

अधिक तपास पोलीस अंमलदार दिवटे हे करत आहेत.

## मारुतीराव तारळकर यांचे हृदयविकाराने निधन

नगर - झोपडी कॅन्टीन सावेडी येथील रहिवासी मारुतीराव शंकर तारळकर (वय ६५) यांचे २७ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे २८ मे रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, पुतणे, भावजय असा परिवार आहे. गणेश, मनोज तारळकर यांचे ते वडील होत. अमृत मुद्रणालयाचे ते कर्मचारी होत.

# दहीगाव शिवारातून ५० हजारांच्या १३ सोलर प्लेट्सची चोरी

नगर - नगर तालुक्यातील दहीगाव शिवारात शेतकऱ्याने शेतात बसविलेल्या सोलर पंपाच्या ५० हजार रुपये किंमतीच्या १३ सोलर प्लेट्स अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत निलेश सर्जेराव म्हस्के (वय ३८, रा. दहीगाव, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या शेतगट क्रमांक ८१ मध्ये २५ मे रोजी सायंकाळी ५ वाजेपासून ते २६ मे रोजी सकाळी ६.३० वाजेदरम्यानच्या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी शेतात प्रवेश करत सोलर पंपाच्या ५० हजार रुपये किंमतीच्या १३ सोलर प्लेट्स चोरून नेल्या आहेत. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार शरद वांढेकर करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### २४ तास उपवास करत असाल तर

२४ तास उपवास करायचा असेल तर रात्री ८ वाजता जेवण करून दुसऱ्या दिवशी रात्री ८ पर्यंत काहीच खायचे नाही फक्त पाणी प्यायचे आहे दिवसभरात ३ ते ४ लिटर पाणी प्या लिंबू पाणी बिना साखर चालेल उपवास सोडताना आधी कोमट पाणी प्या नंतर खजूर किंवा केळं खा आणि अर्ध्या तासाने पातळ खिचडी घ्या याने पोटाला आराम मिळतो. गॅस ॲसिडिटी कमी होते रक्तातील साखर कंट्रोल होते वजन कमी झाल्याने हृदयावरील ताण कमी होतो चक्कर थकवा आला तर लगेच उपवास सोडा.

डायबेटीस लो बीपी गर्भवती असाल तर करू नका उपवास सुरु करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्या. थेट २४ तास न करता आधी १२ तास मग १६ तास असा सराव करून शरीराला सवय लावा. कोणताही नवीन डाएट किंवा उपवास सुरु करण्याआधी तुमच्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घ्या कारण प्रत्येकाचे शरीर वेगळे असते. उपवास हा उपचार नाही फक्त आरोग्य चांगले ठेवण्याचा एक मार्ग आहे जबरदस्ती शरीराला त्रास देऊ नका. नियमित हलका आहार पुरेशी झोप व्यायाम आणि पाणी हेच खरे आरोग्याचे सूत्र आहे.

## पाककला

### मसूरडाळ टिक्की

**साहित्य :** १ कप अख्खी मसूरडाळ, २ मध्यम बटाटे उकडलेले, १ बारीक चिरलेला कांदा, २ हिरव्या मिरच्या बारीक चिरलेल्या, १ इंच आले किसलेले, २ चमचे कोथिंबीर बारीक चिरलेली, १/२ चमचा लाल तिखट, १/२ चमचा गरम मसाला, १/२ चमचा आमचूर पावडर, १/२ चमचा जिरेपूड, चवीनुसार मीठ, २-३ चमचे बेसन किंवा ब्रेड क्रम्ब्स, तळण्यासाठी तेल

**कृती :** मसूरडाळ स्वच्छ धुवून २ तास पाण्यात भिजत ठेवा. नंतर पाणी काढून कुकरमध्ये १ शिट्टी करून शिजवून घ्या. डाळ खूप मऊ नको, थोडी दाणेदार हवी. शिजलेली डाळ पूर्ण पाणी निथळून घ्या. एका मोठ्या बाऊलमध्ये शिजलेली मसूरडाळ, उकडलेले बटाटे कुस्करून घ्या. त्यात कांदा, मिरची, आले, कोथिंबीर घाला. आता लाल तिखट, गरम मसाला, आमचूर, जिरेपूड आणि मीठ घालून चांगले मिक्स करा. मिश्रण सैल वाटत असेल तर २-३ चमचे बेसन किंवा ब्रेड क्रम्ब्स घाला म्हणजे टिक्की बांधली जाईल. हाताला थोडे तेल लावून मिश्रणाचे छोटे गोळे करून चपटे करून टिक्कीचा आकार द्या. तवा गरम करून थोडे तेल टाका. मंद आचेवर टिक्की दोन्ही बाजूने सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत शॅलो फ्राय करा. गरमागरम मसूरडाळ टिक्की पुदिना चटणी किंवा टोमॅटो सॉससोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### नेमप्लेट संबंधी...

* मुख्य दारावर धातूची चमकणारी नावाची पाटी लावा. यामुळे संधी आणि पैसा घराकडे आकर्षित होतो असे मानतात.

* नेम प्लेटवर रात्रभर मंद प्रकाश पडेल अशी व्यवस्था करा. अंधारात असलेली नेम प्लेट घरमालकाला प्रसिद्धी मिळू देत नाही.

* नेम प्लेट जमिनीपासून साधारण ५ ते ६ फूट उंचीवर लावा. डोळ्याच्या लेव्हलला असावी. खूप खाली किंवा खूप वर नको.

* अक्षरे सरळ, स्पष्ट आणि वाचता येतील अशी असावीत. खूप नक्षीकाम, वेडीवाकडी स्टाइल टाळा. वाचायला त्रास होईल अशी अक्षरे संधी हुकवतात

## सौंदर्य

* रात्री ११ ते पहाटे ५ ही झोप ब्युटी स्लीप असते. या वेळेत त्वचा रिपेअर होते. मोबाईल बाजूला ठेवून झोपा.

* लिंबाच्या सालीने नखे घासा. ऑलिव्ह ऑइलने मसाज करा. नखे मजबूत होतात, पिवळेपणा जातो.

* लिंबू + मध + साखर मिक्स करून मानेला ५ मिनिटे चोळा. आठवड्यातून ३ वेळा करा. हळूहळू काळेपणा कमी होईल.

* रोज सकाळी तोंडात पाणी धरून डोळ्यांवर थंड पाण्याचे शिंतोडे मारा.

## सल्ला

फ्रीजमध्ये एका वाटीत खायचा सोडा किंवा अर्धा लिंबू ठेवा. दुर्गंधी जाते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २९ मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, स्वाती १०।३८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज नवीन संधी दार ठोठावेल. अचानक धनलाभ होईल. प्रतिष्ठेत वाढ होईल.

**वृषभ :** रखडलेले पैसे परत मिळतील. कुटुंबात आनंदाची बातमी येईल. सन्मान वाढेल.

**मिथुन :** महत्त्वाची व्यक्ती भेटेल. प्रवासातून फायदा होईल. नवीन करार होईल.

**कर्क :** मन प्रसन्न राहील. घरात शुभ कार्य घडेल. आईकडून लाभ होईल.

**सिंह :** नोकरीत पदोन्नतीचे योग आहेत. सरकारी काम पूर्ण होईल. मोठे लोक मदत करतील.

**कन्या :** अचानक पैसा येईल. गुंतवणूक फायदेशीर ठरेल. जुना वाद मिटेल.

**तूळ :** व्यवसायात तेजी येईल. जोडीदाराकडून सुख मिळेल. भागीदारीतून नफा होईल.

**वृश्चिक :** शत्रू शांत होतील. कोर्ट केसचा निकाल बाजूने लागेल. कर्ज फिटेल.

**धनु :** दूरचा प्रवास घडेल. मुलांकडून चांगली बातमी मिळेल. शिक्षणात यश मिळेल.

**मकर :** जमीन-घराचा प्रश्न सुटेल. वडिलोपार्जित संपत्तीतून लाभ होईल. मान वाढेल.

**कुंभ :** भावंडांकडून मदत मिळेल. नवीन कल्पनेतून उत्पन्न वाढेल. इच्छा पूर्ण होईल.

**मीन :** बोलण्यामुळे कामे होतील. आर्थिक स्थिती मजबूत होईल.

## फिल्मीचक्कर क्र. १२३८ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :** १) शाहरूखखान, काजोल, राणी मुखर्जी यांचा एक चित्रपट ६) ++ आ रही है तेरी याद आ रही है (गाणे) ७) यात धर्मेंद्र नायक आहे ९) ++ + ++ आशिक हैं सदीयों पुराने चाहे तू माने चाहे न माने (गाणे) ११) जुन्या काळातील एक दिवंगत संगीतकार १३) मिल ++ मिल गये आज मेरे सनम आज मेरे जमींपर नही है कदम (गाणे) १४) मोहंमद रफी यांनी आपल्या जीवनातील शेवटचे गाणे या चित्रपटासाठी गायिले १५) 'एक दूजे के लिये' या चित्रपटातील नायिका रती अग्निहोत्रीचे नाव

**उभे शब्द :-** १) तैमूर अलीखान पतौडीची अभिनेत्री आई २) अमिताभ बच्चन, श्रीदेवी, नागार्जुन, शिल्पा शिरोडकर, डॅनी, किरणकुमार, विक्रम गोखले यांचा एक चित्रपट ३) बॉबी देओल, नेहा यांचा एक चित्रपट ४) गीत ++ पत्थरोंने (चित्रपटाचे नाव) ५) +++ इंडिया (चित्रपटाचे नाव) ८) +++++ प प प ध म रे चल गा रे मेरे (गाणे) १०) यात जितेंद्र, श्रीदेवी, जयाप्रदा, शक्ती कपूर, कादरखान आहेत १२) तुम आशा +++ हमारे तुम धरती आकाश हमारे (गाणे)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** शब्द जपून वापरा, कारण तीच नाती जोडतात आणि तोडतातही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### शर्टला कॉलर असण्याचे कारण काय?

शर्टला कॉलर असण्यामागे इतिहास आणि व्यावहारिक उपयोग दोन्ही आहेत. सुरुवातीच्या काळात १६-१७ व्या शतकात पुरुषांचे शर्ट म्हणजे अंगात घालायचा अंतर्वस्त्रासारखा भाग होता जो दिसत नसे. त्याकाळी श्रीमंत लोक गळ्याभोवती वेगळा कॉलर म्हणजे रफ लावत असत जो स्टार्च करून कडक केलेला असे आणि तो प्रतिष्ठेचे लक्षण होते. हळूहळू हा वेगळा कॉलर शर्टलाच कायमचा शिवला गेला कारण दररोज वेगळा कॉलर लावणे त्रासदाय होते. कॉलरचा मुख्य व्यावहारिक उपयोग म्हणजे गळ्याचे संरक्षण करणे. शर्टचा सर्वात जास्त घाण होणारा भाग म्हणजे गळ्याभोवतीचा भाग कारण घाम आणि तेल तिथे जमा होते. कॉलरमुळे जॅकेट कोटचा कॉलर थेट त्वचेला आणि घामाला लागत नाही त्यामुळे महागडे कोट खराब होत नाहीत. दुसरा उपयोग म्हणजे टाय किंवा बोला व्यवस्थित सवण्यासाठी कॉलरचा आधार लागतो. कॉलरशिवाय टायची गाठ लपणार नाही आणि तो नीट दिसणार नाही.

कॉलरमुळे चेहऱ्याला फ्रेम मिळते आणि व्यक्ती अधिक नीटनेटकी प्रोफेशनल दिसते. गोल चेहरा असल्यास टोकदार कॉलर आणि लांबट चेहरा असल्यास पसरट स्प्रेड कॉलर चांगला दिसतो. उन्हाळ्यात कॉलर उभा केला तर मान मागून उन्हापासून वाचते आणि हिवाळ्यात तो उब देतो. कॉलरच्या प्रकारावरून शर्ट फॉर्मल आहे की कॅज्युअल हे कळते बटन-डाऊन कॉलर कॅज्युअल तर विंग कॉलर टक्सिडोसाठी वापरतात. आजकाल कॉलर हे फॅशन स्टेटमेंट झाले आहे वेगवेगळ्या डिझाइनचे कॉलर व्यक्तिमत्व दाखवतात. थोडक्यात कॉलर हे फक्त डिझाइन नसून संरक्षण, सौंदर्य आणि प्रतिष्ठा या तीन गोष्टींसाठी शर्टचा महत्त्वाचा भाग बनले आहे.

शर्टच्या कॉलरचे अनेक प्रकार असतात आणि प्रत्येकाचा उपयोग वेगळा असतो. पॉईंट कॉलर हा सगळ्यात सामान्य प्रकार आहे जो ऑफिस आणि रोजच्या वापरासाठी योग्य ठरतो कारण तो टायसोबत छान दिसतो. स्प्रेड कॉलरमध्ये दोन टोकांमधले अंतर जास्त असते त्यामुळे मोठी टाय नॉट म्हणजे विंडसर नॉट चांगली दिसते आणि तो अधिक स्टायलिश लूक देतो.

बटन-डाऊन कॉलरवर छोटी बटणे असतात जी कॉलर शर्टला चिकटवून ठेवतात हा प्रकार खेळाडूंसाठी बनवला होता कारण खेळताना कॉलर उडू नये. मँडरीन किंवा बँड कॉलरला पाने नसतात तो फक्त गळ्याभोवती पट्टीसारखा असतो आणि तो कुर्ता स्टाइल किंवा कॅज्युअल लूकसाठी वापरतात. विंग कॉलर फक्त टक्सिडो आणि बो टायसोबत वापरतात लग्न किंवा मोठ्या समारंभात त्याची फॅशन असते. कॉलरच्या आत फ्यूजिंग किंवा इंटरलाइनिंगनावाचे कडक कापड लावलेले असते त्यामुळे कॉलर ताठ राहतो आणि धुतल्यावर वाकत नाही.

कॉलरची उंची सुद्धा महत्त्वाची असते जास्त उंच कॉलर लांब मान असणाऱ्यांना शोभतो तर कमी उंचीचा कॉलर ठेंगण्या मानेसाठी चांगला. जुन्या काळात कॉलर आणि कफ वेगळे काढता येत असत कारण संपूर्ण शर्ट रोज धुणे परवडत नसे फक्त घाण झालेले कॉलर-कफ बदलले जात. आजही काही महागड्या शर्टमध्ये कॉलर स्टे नावाच्या प्लास्टिक किंवा धातूच्या पट्ट्या टोकात घालतात जेणेकरून कॉलरचा शेप कायम राहील. उन्हाळ्यात लिननच्या शर्टला मऊ कॉलर असतो कारण कडक कॉलर घामाने त्रासदायक होतो.

कॉलरवर डिझाइन, कॉन्ट्रास्ट रंग किंवा प्रिंट टाकून शर्ट अधिक आकर्षक बनवला जातो. लष्कर आणि पोलिसांच्या युनिफॉर्ममध्ये कॉलरवर बॅज आणि रँक लावण्यासाठी जागा असते त्यामुळे तो महत्त्वाचा भाग आहे. शेवटी कॉलर नसलेला शर्ट म्हणजे टी-शर्ट होतो जो पूर्णपणे कॅज्युअल प्रकारात मोडतो. म्हणूनच फॉर्मलिटी, संरक्षण आणि व्यक्तिमत्व दाखवण्यासाठी शर्टला कॉलर कायमचा जोडला गेला आहे.

### योग्य निर्णय

एका गावात मोठा दुष्काळ पडला. सगळ्या विहिरी, तळी कोरडी पडली. दोन बेडूक मित्र होते. त्यांना प्यायला पाणी मिळेना म्हणून ते पाण्याच्या शोधात निघाले. फिरता फिरता त्यांना एक मोठी, खोल विहीर दिसली. तिच्यात तळाशी थोडेसे पाणी होते. पहिला बेडूक लगेच म्हणाला, अरे वाह! आपण लगेच या विहिरीत उडी मारू आणि मस्त राहू. इथे पाणी आहे, गारवा आहे.

दुसरा बेडूक शांतपणे म्हणाला, मित्रा, थांब. उडी मारणे सोपे आहे. पण समजा उद्या या विहिरीतले पाणीही आटले, मग आपण बाहेर कसे येणार? ही विहीर खूप खोल आहे. आत गेलो की परत येता येणार नाही. पहिल्याने हट्ट केला नाही. दोघांनी विचार केला आणि पुढे निघाले. थोडे दूर गेल्यावर त्यांना एक छोटा ओढा वाहताना दिसला. पाणी कमी होते, पण वाहते होते आणि बाहेर येणे सोपे होते. दोघे तिथेच आनंदाने राहिले. काही दिवसांनी खरंच ती मोठी विहीर पूर्ण कोरडी पडली.

पुढे पावसाळा सुरू झाला. सगळीकडे पाणीच पाणी झाले. ओढ्याचे पाणी वाढले, पण बेडूक मित्रांना धोका नव्हता कारण काठ जवळ होता. त्या खोल विहिरीत मात्र वरून पाणी पडून पूर आला. जर पहिल्या बेडकाने घाई केली असती, तर तो तिथेच अडकला असता. दुसऱ्या बेडकाच्या दूरदृष्टीमुळे दोघांचे प्राण वाचले. गावातल्या लोकांनी ही गोष्ट ऐकली आणि मुलांना सांगू लागले. अडचण आली की लगेच मिळेल त्या मार्गाने जाऊ नका असे आजोबा शिकवत.

आधी शांत बसा, विचार करा, मगच उडी मारा हा धडा पक्का झाला. त्या दोन बेडकांची मैत्री आणखी घट्ट झाली कारण त्यांनी एकमेकांचे ऐकले. तेव्हापासून गावात कोणीही घाईघाईने निर्णय घेत नसे.

तात्पर्य : कोणताही निर्णय घेण्याआधी फक्त आत्ताचा फायदा बघू नये. भविष्याचा विचार करावा.

## जीवन का अमृत (भाग १)



७८. कभी भी अपने अतीत से परेशान न हों, चाहे वह कितना भी उदास और नाखुश रहा हो, क्योंकि दयालु गुरु-शक्ति ने उस समय आपको सर्वोच्च दिव्य दया से धन्य कर दिया, जब आप जिंदा सतुगुरु के कदमों में पहुँचे और उसने आपको स्वीकार कर लिया। पश्चाताप के आसुँओं से हृदय की मैल और अशुद्धता को धोने दें और तब दिल और आत्मा के संपूर्ण समर्पण द्वारा, एक बेहतर जीवन बनाने का प्रयास करें। प्रभु की ज्योति आगे अंतर में हैं और स्वर्गों का संगीत आपको निमंत्रण दे रहा है कि आप उसके संरक्षण में प्रभु के कदमों तक पहुँचें।

### संत महात्माओं की सच्चाई

७९. जो लेख आपने भेजा, वह काफी रोचक है और यह एक अच्छा संकेत है कि कुछ वैज्ञानिक संतो- महात्माओं की शिक्षाओं की सच्चाई को अब देखने लगे हैं और कुल मिलाकर इस नतीजे पर पहुँचे हैं कि हमारे ब्रह्मांड का मूल सत्य जड़ता नहीं, बल्कि संगीत है, शब्द धुन है, जो कि पूरी सृष्टि में गूँज रही है। नामलेवा इस तथ्य से परिचित हैं और उन्हें रास्ता दिखा दिया गया है, ताकि वे महान कर्ता की इस अभिव्यक्ति से जुड़ सकें और प्रभु से निकलने वाले इस अनहद संगीत के सुरीलेपन का आनंद उठा सकें। इसे प्लेटो, एक युनानी दार्शनिक, ने नक्षत्रीय संगीत कहा। तो आप देखें, कितने भाग्यशाली और धन्य हैं वे लोग, जिन्हें एक समर्थ सतुगुरु द्वारा परलोक के रहस्यों की दीक्षा दे दी जाती है। अब अगर नामलेवा रोज़ाना प्रयास रहित प्रयास के द्वारा तरक्की नहीं करते, जबकि उन्हें दिव्य संगीत से जोड़ दिया गया है, तो वे एक दुर्लभ मौका खो देंगें।

८०. ऊपर संत-महात्मा यह विचार कर रहे हैं कि क्या विनाशकारी भविष्य को टाला जाए। आइए, हम उनके हितकारी प्रेम में विश्वास रखें, अपने बेहतर भविष्य के लिए। जो स्थूल शरीर से ऊपर आ चुके हैं, उनका संसार को देखने का नजरिया, बिलकुल बदल जाता है, क्योंकि वे सभी

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

शिवानीदीदी : आपलं संपूर्ण लक्ष कुठे केंद्रित असलं पाहिजे ?

सुरेश ओबेरॉय :

स्वत: वर.

शिवानीदीदी : आपली विचार करण्याची पद्धत आणि भावना यांत आपण बदल घडवायलाच हवा. जेणेकरून आपल्यातील प्रेमात अडथळा येणार नाही. जशी आपली चेतना असेल, तसेच आपले विचार असतील. जसे आपले विचार असतील, तशाच आपल्या भावना असतील. जशा आपल्या भावना असतील, तसं आपलं वागणं असेल.

आधी तुमची चेतना होती 'मी एक वडील आहे.' तुमचे विचार होते 'ही माझ्याशी बोलायची पद्धत नाही.' तुमचं मन दुखावलं आणि तुम्ही त्यानुसारच वागलात.

### तुमचे विचार

आता तुम्ही स्वतःला एक खरी ओळख करून देत तुमची चेतना बदलवता 'मी एक आत्मा आहे जो वडिलांची भूमिका निभावत आहे.' 'मी' किंवा आत्म्याचा मूळ गुण कोणता ?

सुरेश ओबेरॉय : प्रेम आणि शांती.

शिवानीदीदी : यामध्ये समज, शक्ती आणि संयमही आहेत. आता, 'मी एक शांत आत्मा आहे,' ह्या चेतनेसह तुम्ही प्रतिसाद द्याल.

सुरेश ओबेरॉय : ह्याचा अर्थ, मला एखादी गोष्ट किंवा कृती पटली नाही तरीही मी शांततेने, प्रेमाने आणि समजेसह प्रतिक्रिया द्यायची असा आहे का?

शिवानीदीदी : ह्याचा अर्थ असा नाही की, तुमच्याशी कोणीही त्याला हवं तसं वागू शकतो. ह्याचा अर्थ असा की, तुमचा प्रतिसाद अस्वस्थ नसेल.

सुरेश ओबेरॉय : तरीसुद्धा त्यांनी माझं ऐकलं नाही तर ?

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पोलीस : हेल्मेट कुठे आहे?

बंड्या : साहेब, डोक्यात आहे. पोलीस : म्हणजे?

बंड्या : अहो हेल्मेट घालायचंय हे डोक्यात पक्कं आहे, पण घरी विसरलो.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्रात सर्वात जास्त पाऊस कुठे पडतो?

– अंबोली, सिंधूदुर्ग

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कोहळा

११) तळहात, तळपाय यांची आग होत असेल व त्याबरोबर जळवात हा विकार झालेला असेल, तर रात्री झोपताना तळव्यावर कोहळ्याचा कीस बांधून ठेवावा. त्यामुळे थंडावा निर्माण होऊन भेगा हळूहळू कमी होतात. १२) जुनाट ताप, सर्दी, खोकला, क्षयरोग, टायफॉईड, मलेरिया, कावीळ इत्यादी आजारांमुळे अशक्तपणा जाणवत असेल, तर त्यावर कोहळा उत्तम टॉनिक आहे. १३) उन्हाळ्याच्या दिवसांत उष्णतेचा त्रास कमी करण्यासाठी कोहळ्याचा रस साखर घालून प्यावा. १४) भाजलेल्या जखमांचा दाह कमी करण्यासाठी कोहळ्याच्या पानांचा किंवा फळाच्या आतील गर त्वचेवर लावावा. त्यामुळे लगेचच दाह कमी होतो.

१५) चेहऱ्यावरील मुरुमे, काळे डाग कमी होऊन सौंदर्य वाढविण्यासाठी कोहळ्याचा गर चेहऱ्यावर लावावा.

१६) कोहळा हा रक्तपित्तशामक असल्याने शरीरातील कोठल्याही भागातील रक्तस्राव थांबविण्यासाठी कोहळ्याचा एक कप रस खडीसाखरेसोबत घ्यावा.

१७) मूतखडा झालेला असल्यास, तसेच लघवी साफ होत नसल्यास व लघवीला जळजळ होत असेल, तर कोहळ्याचा रस प्यावा.

१८) अशाप्रकारे शरीराच्या सप्तधातूंचे पोषण होऊन त्यांचे कार्य सुरळीत चालण्यासाठी व एकूणच शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी आहारामध्ये कोहळ्याचे सेवन आवर्जून करावे.

सावधानता : अति जुना झालेला व खूप परिपक्व झालेला दबत असलेला कोहळा आहारात वापरू नये.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# स्टेटस् ची वाढत चाललेली इर्षा आनंद हरवतेय

**ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास**




नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचे व्दितीय पुष्प गुंफताना ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास. समोर उपस्थित भाविक वर्ग.

नगर - स्टेटस् ची वाढत चाललेली इर्षा आपला आनंद हरवण्यास कारणीभूत ठरू लागली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ ब्रम्हचारी श्रीमान रेवतीनंदन दास यांनी केले.

येथील नवीन टिळक रोडवरील माऊली सांस्कृतिक भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचे व्दितीय पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी इस्कॉन मंदिराचे व्यवस्थापक गिरीवरधारी दास, वैष्णवतोष्णी दास, डॉ. सतीश फाटके, अशोक कानडे, मदन कांबळे, कैलास चोथे, मिलिंद चवंडके, डॉ.सौ.अंजली फाटके यांच्यासह स्त्री-पुरूष भाविक उपस्थित होते.

श्रीमान रेवतीनंदन दास पुढे म्हणाले, इर्षा करणारा भगवंतापासून दूर जातो. अलिकडे स्टेटस् ची इर्षा इतकी वाढत चालली की, जेवणास बसल्यावर ताटाचे फोटो काढून पाठवले जातात. आपले फोटो जोपर्यंत पाहिले जात नाही तोपर्यंत ताटातील जेवणाचा आनंद घेतला जात नाही. इर्षा मनुष्याचा शत्रू आहे.आपले नुकसान झाले तरी चालेल पण दुसऱ्याचे भले होऊच नये, अशी ही इर्षा होय. इर्षा करायचीच असेल तर भगवंताच्या संकीर्तनाची करावी. भगवान श्रीकृष्णांच्या नामस्मरणाने इर्षा जीवनातून निघून जाते.

सौंदर्य, ज्ञान,धन, प्रसिद्धी, वैराग्य असे ऐश्वर्य असलेले भगवान श्रीकृष्ण असून कपट-छळ नसलेला भागवत ग्रंथ परम कल्याण करणारा आहे. भागवत श्रवणाच्या इच्छेने भगवान श्रीकृष्ण प्रसन्न होतात. भागवत श्रवणासाठी निघाल्यावर पावलो-पावली गोदानाचा लाभ मिळत जातो. श्रवण ही भगवंताची सर्वश्रेष्ठ सेवा. श्रध्दा आणि भक्तीने श्रवण करावे. व्यसन, मांसाहार, व्यभिचार करू नये.

श्रीकृष्ण कथेने कान तृप्त होतात. अंतःकरण संतुष्ट होते. भगवान श्रीकृष्ण नामाने आत्म्याला संतुष्टता मिळते. भक्तीनेच भगवंताला प्राप्त करता येते. शाश्वत आनंदाची प्राप्ती भक्तीनेच मिळते. भगवंताच्या नावातच सुख सामावलेले आहे. भगवान श्रीकृष्णांच्या भक्तीत सर्व शास्त्रांचे सार आहे. श्रीकृष्ण भक्तीने ३३ कोटी देवी-देवता प्रसन्न होतात.

व्यासांनी सर्व शास्त्रांचे कथन करून काढलेले अमृत श्रीमद् भागवत आहे. जीवनाच्या उध्दाराचा मार्ग भागवत दाखवून देते, असा विश्वास श्रीमान रेवतीनंदन दास यांनी व्यक्त केला.

संगीताची सुरेल साथ घेऊन सुरू असलेले. भागवत कथा निरूपण श्रवण करताना भाविकांची ब्रम्हानंदी टाळी लागते आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## गळो कधी न धैर्य अंतरातले

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन

संकलन: दिशान फिचर्स




संकट आले. मन भ्यालो, धैर्य गळाले. कुणी मदतीला नाही आले. स्वतः चेही अवसान गळाले? मग जगणंच व्यर्थ झाले. पण नको ना तसं व्हायला. अरे माणसा जीवन सुखी नको का व्हायला ? मगं संकटावर हवीच मात करायला. तेच सांगतात हे सुभाषित.

संकटाला घाबरायचं कशाला? हिमतीनं उभं राहायचं तोंड द्यायला. भय वाटते, मग तुमचेच संकटाला, लागते संकट स्वतःच पळायला. विजयश्री मग धावते तुम्हाला वरायला. संकटाशी झुंजणे आवश्यक आपले भले साधायला.

पण कधी कधी त्यासाठी जीव घालवावा लागतो धोक्यात. पण एरवी संकट यायचं कसं आटोक्यात? पण जीव धोक्यात घातला की जीव गेला, असं का घाबरायचं? धोका नाही कुठे? पदोपदी ठेच लागे. जीवनात ठायीठायी खाचखळगे. जो धोक्यांचाच विचार मनी बाळगे, तो कसा आनंदाने जगे ? संशयच नाही आणायचा मनात. कसूर ठेवायचा नाही प्रयत्नात. मग झोक्यावर बसून झुलायचं. धोक्याला झुलवायचं. धोक्याला झुलवायचं, दूर घालवायचं, आनंदानं जीवन घालवायचं.

एका अरण्यात ससे राहायचे एका बिळात. एकदा ते बाहेर पडले आणि अकस्मात सिंहाने पुढे ठाण मांडले. ससे घाबरले. काही पळत सुटले, पण एक ताठ उभा राहिला. सिंहाला त्याचे कौतुक वाटले. पण रागही आला. सिंह म्हणाला, तुला मरणाचे भय नाही वाटले? तुझे साथी पळाले, पण तू कसे निर्भयपणे उभे राहणे स्वीकारलेस?

ससा म्हणाला, महाराज, तुमच्यासाठी मरणे तर स्वर्गाला जाणे. त्यासाठी कशाला भिणे? तुम्ही आमचे राजे. पण आज मी उभा राहिलो ते वेगळ्या कारणे. उद्यापासून तुमचे राजपद संपणे.

सिंह रागावला. म्हणाला, का?

ससा म्हणाला, दुसरा शूर तरुण सिंह आलाय या जंगलात. त्याने मारलीत अनेक जनावरे. उद्या तुम्हालाही दाखवणार आहे तो हात.

सिंह ओरडून म्हणाला, हे शक्य नाही. मी उद्या उजाडूच देत नाही. आजच मारतो त्या सिंहाला दाखव कुठंय तो?

ससा त्याला घेऊन एका दरीकडे गेला व म्हणाला, या दरीत तो दडलाय. सिंह म्हणाला, तू हो पुढे. दाखव मला.

ससा घाबरुन म्हणाला, मला त्याचे भय वाटते. मी मरायचे ते आमच्या राजासाठी. आगुंतकासाठी नाही.

सिंह म्हणाला, मग तो कुठे आहे ते कसे ओळखायचे? दरीत कुठल्या जागी शोधायचे ?

ससा म्हणाला, तुम्ही आरोळी ठोका. तो उत्तर देईल. त्या आवाजाच्या रोखाने तुम्ही झेप घ्या.

सिंहाने आरोळी ठोकली. दरीतून त्याला प्रत्युत्तर आले. सिंहाने चिडून झेप घैतली. दरीतली आरोळी त्या सिंहाच्याच आरोळीचा प्रतिध्वनी होता. सिंह फसला. ससा हसला. सिंह दरीत पडून मेला. सशाने संकटावर विजय मिळविला.

**- किशोर गांधी**

# अहिल्यानगरमध्ये ३० मे रोजी 'चाहूल मातृत्वा'ची विशेष कार्यक्रम




नगर - मातृत्वाचा सुंदर प्रवास अधिक आनंददायी आणि जागरूक करण्याच्या उद्देशाने चाहूल मातृत्वाची या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आई होणं म्हणजे नव्याने जन्म घेणं या भावनिक संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम गर्भवती महिला, त्यांचे कुटुंबीय तसेच पालकत्वाचा विचार करणाऱ्या जोडप्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

हा कार्यक्रम ३० मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता ऊर्जा रंगमंच, केडगाव, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमामध्ये मातृत्व या विषयावर व्याख्याते संजय कळमकर हे विशेष मार्गदर्शन करण्यात येणार असून, उपस्थितांना मातृत्वाचा उत्सव आनंदाने साजरा करण्याची संधी मिळणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजन नगर बदलतय आणि अभिप्रिया फोटोज तर्फे करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी ८१४९८१५८१५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

## गत वर्षात ५५ बालविवाह रोखण्यात यश ; १५ कुटुंबांविरोधात एफआयआर दाखल

नगर - जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंध कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करत महिला व बाल विकास विभागाकडून बालविवाह मुक्त भारत अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत बालविवाह प्रतिबंध कायद्याबाबत व्यापक जनजागृती करण्यात येत असून, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत जिल्हा बाल संरक्षण कक्ष, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून एकूण ५५ बालविवाह रोखण्यात यश आले आहे. तसेच बालविवाह प्रकरणांमध्ये १५ कुटुंबांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी दिली.

बालविवाह विरोधी जनजागृतीसाठी पथनाट्य, चिकटपत्रके, पोस्टर्स आदी विविध माध्यमांचा उपयोग करण्यात येत असून, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे काम सातत्याने सुरू आहे. बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्यांच्या नोंदी, जनजागृती उपक्रम तसेच बालविवाह विरोधी शपथ आदी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात बालविवाह होऊ नयेत, यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांकडून शपथ घेण्यात आली आहे.

महाराष्ट्रात कुठेही बालविवाह होत असल्यास नागरिकांनी तत्काळ १०९८ हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी. तसेच याबाबत कोणतीही तक्रार असल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष तसेच जिल्हा चाइल्ड हेल्पलाइन १०९८ केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. कदम यांनी केले आहे.

# एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण करण्यासाठी शासकीय समिती स्थापन

## साऊ एकल महिला समितीच्या सहा वर्षाच्या प्रयत्नांना यश : अशोक कुटे



नगर - एकल महिलांच्या प्रश्नावर धोरण ठरवण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मसुदा समिती नेमली आहे. एकल महिलांना सक्षम करण्यासाठी स्वतंत्र धोरण करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य असणार आहे. महिला बालकल्याण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या या समितीत सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी असून साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांचाही या समितीत समावेश आहे.

साऊ एकल महिला समितीचे अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष अशोक कुटे, राज्य समन्वयक मिलिंद साळवे, तालुका समन्वयक कारभारी गरड, संगीता मालकर, प्रतिभा कुलकर्णी, उज्वला शेळके, प्रकाश जोंधळे, श्रीकांत बिडवे, प्रकाश इथापे, दत्तात्रय उरमुडे, बाळासाहेब जपे, जयश्री अशोक कुटे, सुजाता गोरे, अश्विनी झरेकर, विद्याताई दिवटे, अमोल घोलप, प्रथमेश सोनवणे यांनी या निर्णयाबद्दल सरकारचे मनापासून अभिनंदन केले आहे.

एकल महिलांची मोठी संख्या बघता स्वतंत्र धोरणाची आवश्यकता होती. २०११ साली महाराष्ट्रात एकल महिलांची संख्या ५४ लाख होती, ती १५ वर्षानंतर किमान ७० लाख असेल. त्यामुळे या महिलांचे आर्थिक सामाजिक सांस्कृतिक ग्रामीण शहरी असे सर्व प्रश्न बघता धोरणाची गरज होती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या बजेटच्या भाषणात एकल महिलांसाठी लवकरच धोरण जाहीर करण्यात येईल अशी घोषणा केली होती. त्या घोषणेच्या अंमलबजावणीची साऊ एकल महिला समितीने विनंती केल्यावर मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी एकल महिला प्रश्नावर दोन बैठका घेतल्या व मसुदा समिती स्थापन करण्याचे महिला बालकल्याण विभागाला सूचित केले. महिला बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर या दोघींनीही त्यानंतर एकल महिला धोरण विषयावर चर्चा करण्यासाठी बैठका घेऊन समिती स्थापन केली.

राज्यात असलेल्या सर्व शासकीय विभाग, अधिकारी, लोकप्रतिनिधी व या प्रश्नावर व महिला प्रश्नावर काम करत असलेल्या सर्व संस्था, संघटना यांच्याशी ही समिती चर्चा करेल व विविध विभागांच्या योजनांचे एकत्रीकरण, बदल, नवीन प्रस्ताव करून राज्याचे धोरण होईल. या धोरणामुळे एकल महिलांच्या प्रश्नावर सर्व शासकीय विभाग संवेदनशील होतील व शासन आणि समाजासाठी या महिलांचे प्रश्न महत्वाचे ठरतील. एकल महिला यांच्या अपेक्षा आणि भावना याचे प्रतिबिंब नक्कीच या एकल महिला धोरणात असेल अशी एकल महिलांची भावना आहे.

# श्री स्थानकवासी जैन संघ यांचा अर्ज धर्मादाय उपायुक्तांनी फेटाळला

श्रीरामपूर - श्री स्थानकवासी जैन संघ श्रीरामपूर यांनी अहिल्यानगर येथील धर्मदाय उपायुक्त यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या विश्वस्त मंडळ २०१७ ते २०२२ व २०२४ ते २०२९ बदलाचा अर्ज (बदल अर्ज क्रमांक ९५५/२०२२ व ७७२/२०२४) नामंजूर करण्यात आला आहे. रमेश इंद्रभान लोढा यांनी हा अर्ज दाखल केला होता. धर्मदाय उपायुक्त एन. व्ही. जगताप यांनी हा अर्ज फेटाळला.

अहिल्यानगर विभागाच्या धर्मादाय उपायुक्तांच्या या निर्णयाकडे जैन समाजाचे लक्ष लागले होते. रमेश लोढा यांच्या अर्जाला सतिश उत्तमचंद चोरडीया रोहित वसंतलाल भंडारी, किरण वसंतलाल लुणिया, अभय बन्सीलाल मुथ्था, अमित अभय मुथा यांनी आक्षेप घेतला होता.

रमेश लोढा यांनी न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात श्री स्थानकवासी जैन संघ श्रीरामपूर या न्यासाच्या विश्वस्त मंडळात झालेल्या बदलांची नोंदणी करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम २२ अन्वये हा अर्ज दाखल केला होता. या अर्जानुसार २५ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या निवडीद्वारे नवीन विश्वस्त मंडळाची निवड झाली असून त्या बदलाची धर्मादाय आयुक्त कार्यालयातील नोंदवहीत नोंद करावी अशी विनंती केली होती.

रमेश लोढा यांच्या या अर्जावर आक्षेप घेतांना प्रतिवादी (विरुद्ध) पक्षाने हरकत घेवून अर्ज फेटाळण्याची मागणी केली होती. या अर्जावर निष्कर्ष काढतांना अर्जदार लोढा यांनी सादर केलेली यादी न्यासाच्या कलम ६ (क) नुसार वैद्य नव्हती, ती कायदेशीर ठरू शकत नाही तसेच अर्जदारांनी जी कागदपत्रे झेरॉक्स प्रती दिल्या त्या प्रमाणित नव्हत्या. महावीर स्वरुपचंद राका यांची जॉईंट सेक्रेटरी पदावर केलेली निवड घटनाबाह्य होती. घटनेनुसार अध्यक्ष, उपाध्यक्ष, जनरल सेक्रेटरी व खजिनदार सेक्रेटरी या पाचच पदाची तरतूद आहे. या विश्वस्त मंडळाला यापूर्वी देण्यात आलेली तात्पुरती मान्यता रद्द केली आहे.

या निकालाच्या आधारे श्री स्थानकवासी जैन संघाचे विश्वस्त मंडळ बरखास्त होऊन त्यांचे सर्व अधिकार काढण्यात आलेले आहे. या दाव्यात प्रतिवादींतर्फे पी. ही. बल्लाळ, के. वाय. जराड तर वादी रमेश लोढा यांच्यातर्फे एफ. ए. शेख व प्रविण पांडे यांनी काम पाहिले.

# माणुसकीचा प्रकाश पेरणारा शब्दप्रपंच : 'वाटेवरच्या मशाली'

## पुस्तक समीक्षण



साहित्य हे समाजाचा आरसा असते, असे म्हटले जाते. मात्र, जेव्हा एखादी उपक्रमशील शिक्षिका लेखणी हाती घेते, तेव्हा त्या साहित्यात केवळ सामाजिक प्रतिबिंब नसते, तर समाजाला योग्य दिशा दाखवण्याचे सामर्थ्यही असते. नगर येथील कल्पक शिक्षिका आणि उदयोन्मुख लेखिका सुजाता नवनाथ पुरी यांचा 'वाटेवरच्या मशाली' हा ललित लेखसंग्रह याचेच एक जिवंत उदाहरण आहे. प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या ५५ वैविध्यपूर्ण लेखांचे हे संकलन वाचकांना अंतर्मुख करणारे आणि जीवनातील छोट्या-छोट्या गोष्टींकडे पाहण्याची एक नवी, सकारात्मक दृष्टी देणारे आहे. चपराक प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे नाव 'वाटेवरच्या मशाली' अत्यंत सार्थ वाटते, कारण यातील प्रत्येक लेख सामाजिक अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश पेरण्याचे काम करतो.

या लेखसंग्रहातील विषयांची व्याप्ती मोठी असून लेखिकेने समाजातील विविध घटकांना आपल्या लेखणीने स्पर्श केला आहे. शिक्षण क्षेत्रातील अनुभव मांडताना त्यांनी 'शिक्षण व्यवस्थेतील रेड कार्पेट आणि खडकाळ वाटा' किंवा 'शिक्षक आणि आजचा समाज' यांसारख्या लेखांतून सद्यस्थितीवर भाष्य केले आहे. शिक्षकी पेशा आणि समाजातील त्यांची बदलती प्रतिमा याचे वास्तववादी चित्रण यात पाहायला मिळते. त्याचबरोबर स्त्री-पुरूष समानता, आजची बदललेली जीवनशैली, वृद्धावस्था, आणि कोव्हिड-१९ च्या काळातील मानवी जगणे यांसारख्या गंभीर विषयांवरही त्यांनी अत्यंत हळुवारपणे चिंतन मांडले आहे. 'बाप नावाचा माणूस' किंवा 'घर असावे घरासारखे' या लेखांमधून कौटुंबिक मूल्यांची आणि नात्यांमधील ओलाव्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आहे. मानवी स्वभावाचे विविध पैलू उलगडताना 'माणसं अशी का वागतात?' यांसारख्या लेखांतून त्यांनी मानवी प्रवृत्तींचे केलेले विश्लेषण वाचकाला स्वतःच्या वागण्याबद्दल विचार करायला लावते.

सुजाता पुरी यांच्या लेखणीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची ओघवती आणि रसाळ भाषाशैली. एखाद्या विषयाचा उगीचच शब्दबंबाळ विस्तार न करता, त्यांनी 'पेलाभर बासुंदी'प्रमाणे रंजक आणि मोजक्या शब्दांत आपले विचार मांडले आहेत. या ललित लेखनाला ठिकठिकाणी दिलेल्या काव्यपंक्तींची झालर शब्दसौंदर्यात अधिकच भर टाकते. लेखिकेतील 'समाजशिक्षिका' या पुस्तकात सतत जागृत असल्याचे जाणवते. 'संस्कारांचे बीजारोपण करूया', 'ग्रंथ हेच गुरू' आणि 'संवेदनशीलता काळाची गरज' या लेखांतून त्यांनी समाजाला नैतिकतेचा संदेश दिला आहे. हे केवळ वर्तमानपत्रीय लेखन नसून, त्यात एक प्रकारचे प्रबोधन दडलेले आहे. निराशेने ग्रासलेल्या मनाला प्रेरणा देण्याचे आणि जगण्याचे मर्म सांगण्याचे कसब लेखिकेला उत्तम जमले आहे.

एकंदरीत, 'वाटेवरच्या मशाली' हे पुस्तक सुजाता पुरी यांच्या प्रगल्भ विचारसरणीचे आणि समृद्ध जीवनानुभवांचे प्रतिबिंब आहे. दैनंदिन धावपळीत हरवलेले स्वतःचे अस्तित्व शोधण्यासाठी आणि साध्या गोष्टीतही आनंद शोधण्यासाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरते. सम ाजातील नकारात्मकतेवर प्रहार करून सकारात्मक विचारांची पेरणी करणाऱ्या या 'मशाली' प्रत्येक सुज्ञ वाचकाच्या संग्रही असायलाच हव्यात. एक सजग, सुसंस्कृत आणि सत्शील समाज निर्माण करण्याच्या प्रवासात हा लेखसंग्रह नक्कीच मैलाचा दगड ठरेल.

**- अशोक शेटे,**
प्राथमिक शिक्षक आणि लेखक व कवी,
संगमनेर, मो.नं. ९९२११६९२८६



धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने विनायकनगर, समता कॉलनी आणि शांतीनगर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. (छाया - लहू दळवी)

# धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठान ट्रस्टचा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम



धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने विनायकनगर, समता कॉलनी आणि शांतीनगर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी बोलताना माजी उपमहापौर गणेश भोसले.

नगर - धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने विनायकनगर, समता कॉलनी आणि शांतीनगर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडले.

यावेळी बोलताना माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे ऋतुमानामध्ये मोठे बदल होताना दिसत आहेत. कोणत्याही ऋतूमध्ये ऊन, वारा, पाऊस आणि थंडीचा अनियमित अनुभव येत आहे. सध्या उन्हाळ्यात वाढलेल्या तापमानामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. त्यामुळे पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण आणि संवर्धनाची लोकचळवळ उभी राहणे काळाची गरज आहे. ते पुढे म्हणाले की, देशी वृक्षांच्या माध्यमातून आपल्याला २४ तास मोफत ऑक्सिजन मिळतो. प्रत्येक माणसाला जीवन जगण्यासाठी किमान दोन झाडांची गरज असते. त्यामुळे निसर्गाचे आपल्यावर मोठे ऋण आहे. या भावनेतून प्रत्येकाने वृक्षांवर प्रेम करावे आणि निसर्गाची आवड जोपासावी. गेल्या १५ ते २० वर्षांपासून प्रभागात दरवर्षी पावसाळ्यात स्वखर्चाने किमान शंभर झाडे लावून ती जगविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. झाडांच्या संवर्धनासाठी दोन पाण्याच्या टँकरची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली. वड, पिंपळ आणि लिंब यांसारखी देशी झाडे लावण्यात आली असून ती जतन करण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या वृक्षारोपण कार्यक्रमास माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी नगरसेवक संजय चोपडा, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, अवधूत फुलसौंदर, अशोक पवार, राजू यंदे, ईश्वर कोळी, रामदास खैरे, निलेश गांधी, डॉ. अभय मुथा, सुरेश डहाळे, राजेश थोरात, नरहरी सपकाळ, मुकुंद निकुंभ, राहुल बोरा, नितीन खैरे, मयूर म्हस्के, गणेश टाक, आनंद मुथा, जयकिशन दायमा, भरत फुलसौंदर, विजय फुलसौंदर, जनार्दन वाघ, संतोष ओहोळ, रुक्मिणी नन्नवरे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

यावेळी भगवान फुलसौंदर म्हणाले की, विकासकामांच्या माध्यमातून बुरुडगाव रोड परिसराचा मोठ्या प्रमाणात कायापालट झाला आहे.गणेश भोसले यांनी उभी केलेली वृक्षारोपणाची लोकचळवळ परिसरासाठी प्रेरणादायी ठरत आहे. आज परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष दिसत असून त्यामुळे वातावरणात सकारात्मक बदल जाणवत आहे. ते पुढे म्हणाले की, सध्या उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिकांना वृक्षांचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजले आहे. भविष्यात पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

नगरसेवक प्रकाश भागानगरे म्हणाले की, गणेश भोसले प्रभागामध्ये सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असून त्यांचे काम शहरासाठी दिशादर्शक ठरत आहे. त्यांच्या उपक्रमांचे अनुकरण इतर प्रभागांमध्येही केले जात आहे. फक्त खड्डे खोदून झाडे लावणे पुरेसे नाही, तर त्यांचे संवर्धन करणे ही आजची खरी गरज आहे.

संजय चोपडा यांनीही गणेश भोसले यांच्या वृक्षारोपण आणि संवर्धन उपक्रमाचे कौतुक केले. तसेच विनायकनगर, समता कॉलनी आणि शांतीनगर परिसरातील नागरिकांनी 'वृक्ष दत्तक योजना' राबवून वृक्ष संवर्धनाचा निर्धार केल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम परिसरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरला असून, वृक्ष संवर्धनासाठी लोकसहभागाची गरज अधोरेखित करण्यात आली.

# आईबाबा मुलांचे बेस्ट फ्रेंड बना त्यांना एकटे पडू देऊ नका

आज आपण सर्व मातापिता मुलींच्या सुरक्षिततेसाठी खुप जागरूक असतो आणि जागरूक रहायलाच हवे. कारण काळ दिवस खुप बदलत चालले आहेत. मुलगी बाहेर शिक्षणासाठी गेलेली असेल तर एक जागरूक पालक या नात्याने आपण तिचे वेळोवेळी अपडेट्स घेत असतो आणि ते घ्यायला हवे. आपण पाहतो महिला, मुलींच्या बाबतीत पावलोपावली अनेक चुकीच्या घटना घडत आहेत. जसे आपण मुलींच्या बाबतीत सतर्क असतो तसे आपण मुलांच्या बाबतीत वागतो का ? पालकांना आपला मुलगा एकटा पडला आहे का? तो डिप्रेशनमध्ये जगत आहे का? टिन एजमधून जाताना तो कसल्या ताणतणावामध्ये जगतोय का ? याची खात्री करायला हवी. त्याला भरमसाठ पैसा पुरवला म्हणजे आपली जबाबदारी संपली असे न वागता आई आणि बाबा दोघांनी त्याचे बेस्ट फ्रेंड बना आणि त्याचा कोंडलेला श्वास मोकळा करण्यास मदत करा. अनेक मुले बाहेर शिकताना डिप्रेशनमध्ये जगताना दिसून येत आहेत. पालकांच्या देखील या गोष्टी लक्षात येत नाही. त्यांना वाटते आहे सगळे All Is Well पण नाही.

आपण पाहतो घरी सगळे चांगले असताना देखील मुले आत्महत्या करतात. कारण ते कुठल्या तरी तानतणावामधे जगत असतात. आईबाबा शिक्षणासाठी पैसे पुरवत असतात. मुलांना हवे ते पालक पुरवत असतात त्यामुळे घरच्यांना आधीच पैसे पाठवण्याचा ताण असतो मग आपले प्रॉब्लेम कशाला घरी सांगायचे असा विचार अनेक मुलं करत असतात. आणि एकटेच आतल्या आत ते घुसमट राहतात. आणि जेव्हा असह्य होते तेव्हा आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. मुलांचा अवघड असलेला अभ्यास मुलींसोबत झालेले ब्रेकअप यामुळे मुले डिप्रेशनमध्ये जातात पण यातील एकही गोष्ट ते घरी सांगत नाही. आणि या तणावातील लढाई ते एकटेच लढण्याचा प्रयत्न करतात काहीजण ही लढाई लढण्यात सफल होतात स्वतःला सावरतात पन ज्यांची ही लढाई लढण्याची ताकत कमी पडते जे एकटे पडून कोलमडतात अशी मुले सगळे मार्ग बंद झाले समजून आत्महत्येचा मार्ग निवडतात.

मुलांनो कितीही आणि कोणतेही संकट येऊ द्या फक्त तुमच्या आईबाबांना सांगा घाबरू नका ते तुमचे जन्मदाते आहेत तुम्ही कोणत्याही दलदलीमध्ये फसलेले असाल तरीही तेच तुम्हाला या दलदलीच्या संकटातून अलगद सुखरूप बाहेर काढतील हे लक्षात ठेवा. आई,बाबा तुम्ही मुलांचे चांगले जिवलग मित्र,मैत्रिण बनून रहा. मनमोकळ्या कोणत्याही विषयावर गप्पा मारा. आपले मुले कधीच एकटे पडणार नाही. फक्त पैसा पुरवणे एवढीच जबाबदारी आपली नाही हे लक्षात ठेवा. आईबाबा मुलांचे बेस्ट फ्रेंड बनून राहिले कोणत्याही विषयावर मुलांसोबत मनमोकळ्या गप्पा मारल्या तर बाहेरच्या मित्रांची त्यांना गरज पडणार नाही. चुकिची संगत त्यांना लाभणार नाही. सगळेच मित्र जिवलग किंवा चांगलेच असतात असे नक्कीच नाही त्यामुळे आईबाबा मुलीसारखेच मुलाचे चांगले भविष्य घडण्यासाठी त्याच्याकडे लक्ष द्या. मुलाकडे देखील मुली इतकेच लक्ष द्या आणि सध्या ते खुप गरजेचे आहे. संपत्ती पेक्षा संतती खुप महत्वाची आहे हे लक्षात ठेवा.....

आपल्यापेक्षा आपल्या मुलांच्या जीवनात संघर्ष खुप आहे कारण तो या स्पर्धेच्या युगात जन्माला आलेला आहे. अनेक उच्चशिक्षीत मुलांना नोकरीच्या ताणामुळे घरी वेळ देता येत नाही. पण अनेक आई,बाबा खरोखर मुलांकडून अपेक्षा न करता मुलांना समजून घेत जीवन जगत आहेत.

जाता जाता काही ओळी हे संघर्षमय जीवन जगत असलेल्या मुलांसाठी.....

*बाळ आयुष्यातील सगळा*
*वेळ तुझ्यामध्येच घालवला....*
*आमच्यासाठी तुझ्याकडे*
*मात्र वेळच नाही राहिला.....*
*तुझी चूकच नाही रे स्पर्धेच्या*
*युगात तू आलाय जन्माला....*
*तुझ्याकडे तुला स्वतःलाचं वेळ*
*नाही भरभरून जगायला....*
*ऊच्चशिक्षीत झालात तुम्ही*
*पगारदेखील भरपूर तुम्हाला....*
*वेळ नाही पोरांनो तुम्हालाच*
*तुमच्या पोटाला पोटभर खायला.....*
*घरच्या जबाबदाऱ्या सांभाळून*
*ऑफिसचा ताणतणाव वेगळा....*
*सगळ्यांच्या जबाबदाऱ्यांचा भार*
*मात्र तुझ्या वरचं आहे सगळा.....*
*ताणतणाव घेऊ नकोस शरीर*
*झालयं अनेक आजारांचे घर....*
*खाणेपिणे आणि तब्येत सांभाळ*
*परिवार अवलंबून आहे तुझ्यावर...*
*तुला लहानाचे मोठे करतानाच्या*
*मनात खुप आहेत आठवणी....*
*तू आहे तिथे सुखी रहा पन तुझ्या*
*आठवणीने डोळ्यात येते पाणी.....*
*बाळ तुझ्या जबाबदाऱ्या तुझा*
*परिवार यामधे जग तू आनंदी....*
*शेवटपर्यंत आमचा आई बाबांचा*
*जिव गुंतलेला असेल तुझ्यामंदी...*

शब्दांकन – **सौ. आशा सुधीर साठे,**
सैनिक पत्नी अहिल्यानगर....९६०४०५६९२८

## अग्नीतत्व-२

आपल्या शरीरातल्या मणिपूर चक्राशी संबंधित असलेल्या या तत्वाचा विचारसुद्धा चेतना देणारा असाच आहे.

या मणिपूर चक्राचा बिजमंत्र ओम ह्रीं असा आहे. ऊर्जेचे शक्तीमध्ये रुपांतर करण्याचे प्रमुख काम या चक्राचे आहे. म्हणुनच वास्तुशास्त्रात उपदिशा महत्त्वाच्या आहेत. कारण दिशांमधे ऊर्जा तर उपदिशेत त्या ऊर्जेचे बळ शक्ती स्वरुपात आहे. हे चक्र शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक शक्ती आपल्याला प्रदान करते.

वास्तुशास्त्रातसुद्धा पूर्व आणि दक्षिण या दिशेच्यामध्ये हे तत्त्व अग्नेय दिशा नावाने विराजमान झालेले आहे. वास्तुशास्त्रात या पूर्व अग्नेय प्रभागातल्या दोषांचे प्रतिबिंब आपण आज बदलत्या आर्किटेक्चरमध्ये पाहतो आणि बहुतांश ठिकाणी ते अनुभवतो. काळ जसा बदलतोय तशी कुंडल्यांची पण उलथापालथ होतीये.

आपल्या वास्तुत अस्तित्वात असलेले लगेच लक्षात येतील असे दोष म्हणजे अग्नेय प्रभागात असलेले शौचालय, जीना किंवा लिफ्ट, पाण्याच्या जमिनी, खालच्या किंवा वरच्या टाक्या, आजकालच्या फ्लटमध्ये एक आपल्या डिझाईनचा भाग म्हणून सुळक्याच्या रूपाने केलेले एक्सटेंशन. अंडरग्राऊंड पार्किंग हे छोटे-मोठे अनेक दोष आपल्या बेशिस्त जीवनशैलीला अधिकच चालना देत आहेत. या अग्नीतत्वातल्या दोषामुळे सगळ्या जगात धुमाकूळ घालणारा मधुमेह या बेशिस्त जीवनशैलीचाच भाग नाही का? कारण चयापचयाची क्रिया जेव्हा अग्नीतत्व चालवते. त्यात बिघाड झाला तर असे दिर्घकालीन न सुटणारे आजार का नाही आपल्या भोवती फेर धरणार? लहानपणापासून सुरू होणारे डोळ्यांचे विकार, पोटाचे विकार, अति आत्मविश्वासाने होणारे नुकसान आणि त्या नुकसानीत डिप्रेशनच्या स्वरूपात अडकणारा तरूण वर्ग किंवा ऐन महत्त्वाच्या वेळी काम आणि मुद्दे विसरणं किंवा विस्मरण, न्युनगंड, आळस, दांभिकपणा, पिढ्यांमधले मतभेद, गृहकलह, व्यभिचार, पुरूष संतती, शिक्षण, करिअर आदि प्रश्न, हार्मोनल प्रश्न, कुंटुंबातल्या एकमेकांबद्दलचा अनादर हे सर्व या बिघडलेल्या अग्नीतत्वाचे परिणाम आपण अनुभवतो. ज्योतिष शास्त्रात सुद्धा मेष, सिंह, धनु या अग्नीतत्वांच्या राशीत किंवा त्यांच्या नक्षत्रात असलेला दोष. कुंडलीतील लग्न, पंचम, नवम स्थानांचा दोष हा वास्तूत या पूर्व अग्नेय प्रभागातून म्हणजेच अग्नीतत्वातून डोकावतोच. कारण, कुंडली म्हणजे आपल्या जन्माच्या वेळी आकाशात असलेल्या ताऱ्यांचा नकाशा. तर त्याचे मुर्त स्वरूप म्हणजे आपली वास्तू. आपले शरीर या षट्चक्रांच्या कार्यावर चालते. या चक्रावर वात, पित्त, कफ यांचे संतुलन साधून आयुर्वेद माणसाला निरामय आरोग्यदायी जीवन प्रदान करते.

या अग्नीतत्वात बाधा असेल म्हणजेच दोष असेल तर नुसत्या वास्तुत उपचार करून चालत नाही. त्याला वैयक्तिक उपचारांची जोडही द्यावी लागते. योगशास्त्र, संगितशास्त्र हे त्यासाठी तर आहेत. विविध प्राणायाम, चालणे, योगासने, सतत कामात रहाणे, काही ठराविक संगीत ऐकणे यांसारख्या उपायांची जोड दिली तर एकूणच केलेल्या सर्व उपायांचा उपयोग हा दीर्घकालीन फलदायी होतो. संगीतशास्त्राचा विचार करता, यमन राग, श्री राग, हमीर राग, भूपराग, भैरवी राग, राग भीमपलासी, राग सारंग, खमाडा राग इ. वैद्यकिय इलाज.. वास्तूशास्त्रीय उपाय या त्रिसुत्रीच्या माध्यमातून आपण आपल्या शरीरावर ताबा ठेवणाऱ्या या मणिपूर चक्राचा मणी आपल्या हातात ठेवू शकतो.

**– डॉ. कौस्तुभ काळे,**
मो. ९८५०९४१८८१.

# जैवविविधता नेगेन्ट्रॉपी मोहिमेतून महाराष्ट्रातील २ लाख हेक्टर जमीन हिरवीगार करण्याचा निर्धार

**उजाड जमिनीला मिळणार नवजीवन; 'रेन गेन बॅटरी'मधून २१ व्या शतकाची सदाहरित क्रांतीचा संकल्प, पीपल्स हेल्पलाईनचा प्रस्ताव, भूमिगत ओलाशय, वृक्षसंवर्धन आणि लोकविज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीचा मार्ग**

नगर – महाराष्ट्रातील दोन लाखांहून अधिक हेक्टर उजाड, कोरडी आणि निर्जीव झालेली जमीन पुन्हा हिरवीगार करण्यासाठी जैवविविधता नेगेन्ट्रॉपी हरित क्रांती राबविण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने मांडण्यात आला आहे. स्थानिक लोकविज्ञान, नैसर्गिक साधने आणि पावसाच्या पाण्याचे वैज्ञानिक व्यवस्थापन यांच्या माध्यमातून ही क्रांती उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या मोहिमेमुळे फळांनी लगडलेली झाडे, पक्ष्यांचा किलबिलाट, फुलपाखरांचे नृत्य आणि समृद्ध परिसंस्था पुन्हा निर्माण होऊ शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत असला तरी त्यातील बहुतांश पाणी वाहून जाते किंवा उन्हामुळे बाष्पीभवन होते. परिणामी जमिनीत पुरेशा प्रमाणात पाणी मुरत नाही आणि ओलाशय टिकत नाही. यामुळे जमीन कोरडी पडते, शेतीची उत्पादकता घटते, विहिरी कोरड्या होतात आणि जैवविविधतेचा ऱ्हास होतो. अनेक भागांत जमीन मृत प्रदेशासारखी दिसू लागल्याने पर्यावरणासह शेतीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.



या गंभीर समस्येवर उपाय म्हणून रेन गेन बॅटरी, बारमाही भूमिगत ओलाशय आणि जैवविविधतेवर आधारित वृक्षसंवर्धन निगेन्ट्रापी या तीन संकल्पना पुढे आणण्यात आल्या आहेत. प्रत्येक झाडाजवळ जमिनीखाली पावसाचे पाणी साठवून ठेवणारी विशेष नैसर्गिक रचना तयार करण्याची कल्पना मांडण्यात आली आहे. दगड, वाळू, झाडं मुरूम आणि इतर नैसर्गिक घटकांचा वापर करून तयार होणाऱ्या या व्यवस्थेला भूमिगत पावसाची बॅटरी असे संबोधण्यात आले आहे.

पाऊस पडताच हे पाणी थेट जमिनीत साठवले जाते. त्यामुळे पाणी वाहून जात नाही किंवा उन्हामुळे वाफ बनून उडून जात नाही. हे पाणी हळूहळू जमिनीत मुरत राहते आणि झाडांच्या मुळांना बाराही महिने आवश्यक ओलावा पुरवते. एका पावसाळ्यात साठवलेले पाणी संपूर्ण वर्षभर झाडांना जगण्याची ओल पुरवठा देऊ शकते, असा दावा या मोहिमेच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

पूर्वी पावसाचे मोठे प्रमाण वाया जात असल्याने जमिनीत ओलावा टिकत नव्हता. त्यामुळे झाडांची वाढ खुंटत होती आणि शेतकऱ्याला स्थिर उत्पन्न मिळत नव्हते. मात्र रेन गेन बॅटरी पद्धतीमुळे पाणी मोठ्या प्रमाणावर जमिनीत मुरेल, भूमिगत ओलावा टिकून राहील आणि झाडांच्या जगण्याची क्षमता वाढेल. यामुळे फळझाडे, औषधी वनस्पती, सावली देणारी वृक्षराजी आणि जैवविविधतेला पोषक परिसंस्था निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या हरित मोहिमेमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अनेक स्रोतांमधून वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. फळबागांमधून वर्षभर उत्पन्न मिळू शकेल. मधमाशांच्या पालनातून शुद्ध मध उत्पादन होईल. गांडूळखतातून सेंद्रिय खत तयार करून त्याची विक्री करता येईल. औषधी वनस्पतींच्या लागवडीमधूनही स्वतंत्र उत्पन्नाचे साधन निर्माण होणार आहे. विशेष म्हणजे यासाठी मोठे कालवे, महागडी यंत्रणा, रासायनिक खते किंवा प्रचंड भांडवलाची आवश्यकता भासणार नाही. निसर्गालाच शेतकऱ्याचा भागीदार बनविणारी ही संकल्पना असल्याचे मत पीपल्स हेल्पलाईनचे ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केले.

या मोहिमेसाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हु सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीर बहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले, प्रकाश गोसावी आदी कार्यकर्ते प्रयत्नशील असून राज्यभर ही संकल्पना पोहोचविण्यासाठी जनजागृती मोहिमाही राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# अधिकमासात अंतःकरणातील भावच श्रेष्ठ; नारदीय कीर्तन सेवेत संतवाङ्.मयाचा जागर

**निसळशास्त्री यांच्या विद्वत्तेचा वारसा लाभलेल्या पणतीकडून अभ्यासपूर्ण निरूपण**



सनातन धर्म सभेच्या वतीने ह.भ.प. कु. रेणुका सिध्देश्वर निसळ यांचा सन्मान पसायदान ची प्रतिमा देऊन करण्यात आला. समवेत निळकंठ देशमुख,उमेश नगरकर, उमेश वाळुंजकर, राजेंद्र नगरकर आदी.. (छाया – उदय जोशी)

नगर – अधिकमास खऱ्या अर्थाने सफल करावयाचा असेल, तर अंतःकरणातील निर्मळ भाव, श्रद्धा आणि नामस्मरण यालाच सर्वाधिक महत्त्व आहे, असा प्रभावी संदेश ह.भ.प. कु. रेणुका सिध्देश्वर निसळ यांनी आपल्या नारदीय कीर्तन सेवेतून दिला. सनातन धर्म सभेत आयोजित या कीर्तन कार्यक्रमात संत साहित्य, नाममहिमा, संतांचे श्रेष्ठत्व आणि नारदीय कीर्तन परंपरेचे जतन या विषयांचे अत्यंत अभ्यासपूर्ण आणि रसाळ निरूपण करण्यात आले. विद्वान कीर्तनाचार्य निसळशास्त्री यांच्या पणतीने सादर केलेल्या या सेवेमुळे कार्यक्रमाला विशेष आध्यात्मिक आणि वैचारिक उंची लाभली.

कीर्तनाच्या पूर्वार्धात संत एकनाथ महाराज यांच्या शांती ब्रह्म... या अभंगाच्या माध्यमातून भक्तीतील भावाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. अधिकमास हा केवळ धार्मिक विधी, उपवास किंवा कर्मकांड यापुरता मर्यादित नसून अंतःकरणातील श्रद्धा, ईश्वरनिष्ठा आणि नामस्मरण यांमुळेच तो सफल ठरतो, असे निरूपण करण्यात आले. भक्ती करताना बाह्य दिखाऊपणापेक्षा अंतःकरणातील शुद्ध भाव अधिक महत्त्वाचा असल्याचे उदाहरणांसह स्पष्ट करण्यात आले.

उत्तरार्धात संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांद्वारे संतांचे महत्त्व, श्रेष्ठत्व आणि नामस्मरणाची ताकद यांचे प्रभावी विवेचन करण्यात आले. तुकाराम तुकाराम म्हणता यम कापे तसेच गाथा पाचवा वेद या उक्तींचा संदर्भ देत संतवाङ्याचे दैवी सामर्थ्य अधोरेखित करण्यात आले. संतांचे विचार हे समाजाला दिशा देणारे असून नामस्मरणामुळे जीवनात शांती, समाधान आणि आत्मिक आनंद प्राप्त होतो, असे चिंतनात्मक निरूपण करण्यात आले.

कीर्तन सेवेला तबल्यावर हर्षद भावे यांनी तर हार्मोनियमवर कल्याण मुरकुटे यांनी सुरेल साथसंगत केली. त्यांच्या समर्थ साथसंगतीमुळे सेवेला अधिक उठाव प्राप्त झाला.

सनातन धर्म सभेच्या वतीने ह.भ.प. कु. रेणुका सिध्देश्वर निसळ यांचा सन्मान पसायदान ची प्रतिमा देऊन करण्यात आला. निळकंठ देशमुख, उमेश नगरकर, उमेश वाळुंजकर, राजेंद्र नगरकर उपस्थित होते.

यावेळी नीलकंठ देशमुख यांनी नारदीय कीर्तन परंपरेचे जतन करण्याची गरज अधोरेखित केली. हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या या सेवेमुळे संतविचार आणि भारतीय संस्कृतीचे जतन होत असल्याचे त्यांनी सांगितले. सनातन धर्म सभेची ही परंपरा समाजासाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास उमेश नगरकर, उमेश वाळुंजकर, राजेंद्र नगरकर यांच्यासह भाविक उपस्थित होते. दोन्ही सेवा सर्वार्थाने परिपूर्ण ठरल्याने उपस्थित श्रोत्यांना परमानंदाची अनुभूती मिळाली.

# भविष्यात हरित ऊर्जेशिवाय पर्याय नाही

**अमित काळे यांचे प्रतिपादन; ग्राहक पंचायतीच्या मासिक बैठकीत पारंपरिक ऊर्जेवर चर्चासत्र**

नगर – अन्न, वस्त्र आणि निवारा या सोबतच ऊर्जा ही फार महत्त्वाची गरज झाली असून, येणाऱ्या काळात हरित ऊर्जे चे महत्त्व कमालीचे वाढणार आहे. सौर, पवन, अणू ऊर्जा, हायड्रोजन आणि वस्तूंचा मोठ्या प्रमाणात पुनर्वापर केला तरच प्रत्येक घर स्वयंपूर्ण होऊ शकेल असे प्रतिपादन ग्राहक पंचायतीचे सदस्य, अपारंपारिक ऊर्जा विषयातील तज्ज्ञ तथा ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष अमित काळे यांनी केले.

ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या अहिल्यानगर महानगर कार्यकारीणीच्या आयोजित बैठकीत सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना श्री. काळे यांनी आपले विचार मांडले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर होते.

सौर ऊर्जेची उपलब्धता मोठ्या प्रमाणात असून घरगुती वापरासाठी त्याचा वापर करणे अतिशय संयुक्तिक असून सरकारने अथवा महावितरणने घरगुती वापरासाठी कोणतेही अधिक शुल्क लावले नसून, अनुदानावर या सिस्टीम बसवता येऊ शकतात. त्याशिवाय अल्प दराने कर्ज सुविधा विविध राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

### 'ग्रीड सपोर्ट चार्जेस' या कराचा फटका

व्यावसायिक तसेच औद्योगिक क्षेत्रावर होऊन मोठ्या प्रमाणात सौर ऊर्जा प्रकल्पांना खीळ बसू शकते.

याशिवाय भारतात बनविल्या गेलेल्या (डीसीआर) सोलर पॅनलच्या बंधनामुळे व्यावसायिक तसेच औद्योगिक क्षेत्रामध्ये स्थापित करण्यात येणाऱ्या प्रकल्पांच्या किंमती नक्कीच वाढू शकतील. आखातातील युद्धामुळे क्रूड ऑइलच्या पुरवठ्यात होणाऱ्या अडचणीमुळे तेल संकट गडद झाले असून, अधिक दर देऊन तेल विकत घ्यावे लागत आहे.

'हरित भारत' या संकल्पनेसाठी सर्वांनी सौर ऊर्जा तसेच इतर अपारंपारिक ऊर्जेचा वापर करणे काळाची गरज ठरणार आहे असे श्री. काळे यांनी सांगितले.

यावेळी झालेल्या प्रश्नोत्तरामध्ये ग्राहक पंचायतीच्या सदस्यांनी विचारलेल्या अनेकविध प्रश्नांना श्री. काळे यांनी समर्पक उत्तर दिले.

यावेळी जिल्हा सचिव ॲड. सिद्धार्थ वाघमारे यांनी ग्राहक पंचायतीकडे आलेल्या तक्रारींच्या संदर्भात चर्चा केली. जिल्हा कोषप्रमुख कृष्णा बागडे यांनी आगामी कार्यक्रमाच्या संदर्भात सदस्यांना माहिती दिली.

यावेळी ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर, जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय सोनार, कोष प्रमुख कृष्णा बागडे, महिला संघटिका शलाका रसाळ, महानगरपालिकेचे माजी सहाय्यक आयुक्त संजीव परसरामी, संजय जोशी, अजित कटारिया, रवींद्र सातपुते आदी उपस्थित होते.

# हाय रिस्क माता शोधा, बालमृत्यूचे प्रमाण कमी करा : डॉ. कपिल आहेर

**नाशिक आरोग्य विभागाचे उपसंचालकांची अहिल्यानगर मनपा आरोग्य विभागाची आढावा बैठक**



महापालिका आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ. कपिल आहेर. (छाया – लहू दळवी)

नगर – अहिल्यानगर आपला दवाखाना हा राज्य शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी उपक्रम असून प्रत्येक नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी ही आरोग्य विभागाने गांभीर्याने पार पाडणे आवश्यक आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक नागरिकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचल्या पाहिजेत. प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये दररोज किमान १०० ते १५० रुग्णांची ओपीडी होणे गरजेचे असून नागरिकांना मोफत औषधोपचार सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये जाऊन आरोग्य सुविधांबाबत जनजागृती करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन नाशिक आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ.कपिल आहेर यांनी केले.

अहिल्यानगर महापालिका आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल यांच्यासह डॉक्टर, परिचारिका व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. कपिल आहेर म्हणाले की, जन्मलेल्या प्रत्येक बालकाच्या लसीकरणाबाबत विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील रुग्णालयांमध्ये जन्मलेल्या बालकांना तातडीने झिरो डोस देण्यात यावा, जेणेकरून कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही. तसेच आरोग्य केंद्रामार्फत हाय रिस्क मातांचा शोध घेऊन त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी करून योग्य उपचार करण्यात यावेत.

बालक जन्मल्यानंतर घरी गेल्यावर त्याची काळजी कशी घ्यावी, याबाबत आशा सेविकांनी घरोघरी जाऊन माहिती द्यावी. आशा सेविका या आरोग्य विभागातील महत्त्वाचा दुवा असून त्यांच्यामार्फत आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचू शकतात. जन्मलेल्या बालकांची योग्य पद्धतीने काळजी घेतल्यास बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

मुलींना देण्यात येणाऱ्या कॅन्सर प्रतिबंधक लसीकरणाबाबत पालकांमध्ये जनजागृती करण्याची आवश्यकता असून लसीकरण वाढविण्यासाठी विविध उपाययोजना राबवाव्यात. ओपीडीमध्ये लहान मुलांची तपासणी करताना त्यांच्या शरीराची योग्य पद्धतीने पाहणी करावी. अंगावर फिवर रॅश किंवा इतर लक्षणे आहेत का, हे तपासून त्यानुसार उपचार करण्यात यावेत, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

डॉ. आहेर पुढे म्हणाले की, मी आता दर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात स्वतः येथे येऊन आढावा बैठक घेणार आहे. फक्त बैठक न घेता प्रत्यक्ष आरोग्य केंद्रांची पाहणी करून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांची माहिती घेणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागाचे काम समाधानकारक असल्याचे सांगत त्यांनी भविष्यात आणखी चांगल्या पद्धतीने आरोग्य सेवा देण्याचे आवाहन केले. तसेच टीबी मुक्त भारत अभियान सुरू असून अहिल्यानगर शहर टीबीमुक्त करण्यासाठी विशेष उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर म्हणाले की, नाशिक आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. कपिल आहेर यांनी आरोग्य विभागाच्या बैठकीत विविध आरोग्यविषयक उपक्रमांबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. महानगरपालिका नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा देण्यासाठी कटिबद्ध असून आरोग्य सेवा घराघरापर्यंत पोहोचविण्यासाठी आशा सेविकांची मदत घेतली जाणार आहे. त्यांच्यासाठी विशेष कार्यशाळा घेऊन आवश्यक प्रशिक्षण दिले जाईल व त्यानुसार आरोग्य सुविधा प्रभावीपणे राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

डॉ. सतीश राजुरकर यांनी महापालिका आरोग्य विभागामार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध आरोग्य सुविधांची माहिती दिली. शासनाच्या पोर्टलवर सर्व माहिती नियमितपणे अपडेट केली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. डॉ. कपिल आहेर यांनी दिलेल्या सूचनांनुसार आरोग्य विभागाच्या कामकाजात अधिक सुधारणा करून नागरिकांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीदरम्यान उपसंचालक डॉ. कपिल आहेर यांनी डॉक्टर, परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधत विविध प्रश्न विचारून आरोग्य विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. तुमचे कामकाज चांगले असून भविष्यात आणखी उत्कृष्ट सेवा देऊन नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्या, अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

# भारतीय इतिहास व संस्कृतीची होणारी मोडतोड थांबल्याने नव्या वास्तव चित्रपटांद्वारे जागृती

**दिग्दर्शक कामाख्या सिंह यांचे प्रतिपादन; ग.म.मुळे व्याख्यानमालेत उलगडला चित्रपट सृष्टीचा वास्तववादी प्रवास**

नगर – पूर्वी अनेक चित्रपटांतून भारतीय इतिहास व संस्कृतीची मोडतोड करून विकृत चित्रण करण्यात आले. दिवार, मुगल-ए-आझम यांसारख्या अनेक चित्रपटांमधून समाजमनावर चुकीचा प्रभाव टाकला गेला. मात्र आता छावा, द काश्मीर फाइल्स, द केरळ स्टोरी आणि धुरंधर या सारख्या चित्रपटांतून वास्तववादी विषय मांडले जात आहे. त्यामुळे भारतीय इतिहास व संस्कृतीची होणारी मोडतोड थांबत आहे. या वास्तव चित्रपटांमुळे नागरिक आता जागरूक होत आहेत. हे हिंदी चित्रपट सृष्टीमधील मोठे परिवर्तन आहे, असे प्रतिपादन केरळ स्टोरी -२ चित्रपटाचे दिग्दर्शक कामाख्या सिंह यांनी केले.

अहिल्यानगरमध्ये सुरू असलेल्या ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेच्या तुतीय दिवशी केरळ स्टोरी -२ चित्रपटाचे दिग्दर्शक कामाख्या सिंह यांची अभिनेते दिपक करंजीकर यांनी 'बदलती हिंदी सिनेसृष्टी' या विषयावर प्रकट मुलाखत घेतली. यावेळी कामाख्या सिंह यांनी लव्ह जिहाद, धर्मांतर यावर विचार व्यक्त करून केरळ स्टोरी २ चित्रपट निर्मिती मागची भूमिकां विषद केली.

या व्याख्यानास प्रमुख पाहुणे उद्योजक श्रीगोपाल धूत, बडीसाजन ओसवाल श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, जनजाती कल्याण आश्रमचे पदाधिकारी श्रीकांत आपटे, राजेश झंवर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह विविध क्षेत्रांतील नागरिक उपस्थित होते.

कामाख्या सिंह म्हणाले, लव्ह जिहाद व धर्मांतराच्या घटनांमागील वास्तव समाजासमोर आणण्यासाठीच 'केरळ स्टोरी-२' चित्रपटाची निर्मिती केली. लव्ह जिहादच्या माध्यमातून जिहादी देशातील हिंदू महिला, मुली व पुरुषांना टार्गेट करत आहेत. गरीब, गरजू हिंदूंचे धर्मांतर करून त्यांचा कसा अतोनात छळ केला जातो हे वास्तव पणे मांडले. या जिहादींचे हिंदू विरोधातील हे छुपे युद्ध आहे. देशात हिंदूंची लोकसंख्या कमी होत असून त्यांची झपाट्याने वाढत आहे. जर हिंदू वेळीच



विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमाच्या तृतीय दिवशी केरळ स्टोरी -२ चित्रपटाचे दिग्दर्शक कामाख्या सिंह यांची अभिनेते दिपक करंजीकर यांनी 'बदलती हिंदी सिनेसृष्टी' या विषयावर प्रकट मुलाखत घेतली.

जागे झाले नाहीतर देशाला व धर्माला फार मोठा धोका निर्माण होणार आहे. लव्ह जिहाद विरोधात अद्याप एकही कायदा नसल्याने त्यांचे फावते आहे. पण हिंदूंनी या विरोधात संघटित होणे हाच एकमेव पर्याय आता आहे. लहान मुलामुलींच्या मनात आतापासूनच याबाबत जनजागृती सुरु करून भविष्यातील धोक्याची त्यांना कल्पना द्या, असे अवाहन केले.

यावेळी कामाख्या सिंह यांनी बदलत्या हिंदी चित्रपट सृष्टीविषयी माहिती दिली, ते म्हणाले, देशातील नागरिकांवर चित्रपट सृष्टीचा मोठा प्रभाव आहे. याचा फायदा घेत काही शक्तींनी चित्रपटांच्या माध्यमातून आजपर्यंत मोठ्या प्रमाणात देशाची संस्कृती मोडण्याचे कारस्थान केले. त्यामुळे मी चित्रपट सृष्टीकडे वळल्यावर सत्य मांडणारे, दलित व सामान्य नागरिकांच्या व्यथा मांडणाऱ्या शॉर्ट फिल्मस् निर्मिती केली. त्यास मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भोर चित्रपटातूनही हेच मंडळाचा मी प्रयत्न केला. आता बऱ्याच नव्या चित्रपटांमधून वास्तवता मांडली जात असल्याने समाधान वाटते. देशाच्या आत्म्याला व मूळ विमर्शला जर जिवंत व जागृत ठेवायचे असेलतर सनातनींनी रोज सोशल मिडीयावर देश व संस्कृतीचे सकारात्मक विचार मांडण्यास सुरवात केली तर खोटे नॅरेटिव्ह पसरणार नाहीत.

यावेळी मुलाखतकार अभिनेते दीपक करंजीकर यांनी दिग्दर्शक कामाख्या सिंह यांना चित्रपट सृष्टीतील विविध समयसूचक प्रश्न विचरून मुलाखत रंगतदार केली. देशातील नागरिकांना जागरूक करणारे वास्तववादी चित्रपटांची निर्मिती केल्याबद्दल सिंह यांचे कौतुक केले. चित्रपट माध्यमांचे समाजिक उत्तरदायित्व कसे असावे याचे मूर्तिमंत उदाहरण कामाख्या सिंह हे असून ते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे अंत्योदयचा विचार प्रत्यक्षात आणणारे देशातील एकमेव दिग्दर्शक आहेत. चित्रपटाच्या मायावी दुनियेतील ते सच्चे माणूस आहेत, असा शाब्दिक गौरव करंजीकर यांनी केला.

प्रारंभी दीपप्रज्वलन झाले. चंद्रकांत तागड यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. अनिल मोहिते, राहुल जामगावकर, राजेश झंवर, श्रीगोपाल जाखोटिया, संतोष माणकेश्वर, पुष्कर कुलकर्णी व महावीर गुगळे यांनी पाहुण्यांचा सत्कार केला. डॉ.ऋषिकेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अशोक गायकवाड यांनी आभार मानले.

# बकरी ईदनिमित्त मुस्लिम युवकांकडून गोशाळेत चारा वाटप

## गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करा : द्वेष नव्हे, एकात्मतेची गरज : आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशन

नगर – बकरी ईद (ईद-उल-अजहा) या पवित्र सणानिमित्त शहरात धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि मानवतेचा अनोखा संदेश देणारा उपक्रम २८ मे रोजी पार पडला. मुस्लिम समाजातील युवकांनी ईदच्या नमाजनंतर थेट गोशाळेत जाऊन गाईंना चारा वाटप करत समाजासमोर बंधुभावाचे एक वेगळे उदाहरण उभे केले. या उपक्रमामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच असते, हा संदेश देण्यात आला.



आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या वतीने सतनाम साक्षी गोशाळेत चारा वाटप करण्यात आला.

कुष्ठधाम रोड, बारस्कर मळा येथील सतनाम साक्षी गोशाळेत आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. ईदच्या आनंदात सहभागी होत मुस्लिम युवकांनी गोमातेला चारा अर्पण करून धार्मिक एकात्मतेची भावना जपली. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, मौलाना शफिक कासमी, नगरसेवक हाजी शैबाज, शैबाज बॉक्सर, शहानवाज शेख, फिरोज पठाण, फिरोज आर्किटेक, तनवीर तांबोळी, आयान शेख, मुजम्मिल शेख, शाहिद मोमीन, जीशान शेख, साहिल सय्यद यांच्यासह गोशाळेचे सचिव सीए शंकर अंदानी, मुकेश माधवाणी आणि अनेक युवक उपस्थित होते.

ईदसारख्या धार्मिक सणाच्या दिवशी मुस्लिम समाजातील युवक गोशाळेत चारा घेऊन पोहोचल्याने उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. सम ाजात अनेकदा अफवा आणि गैरसमजांच्या माध्यमातून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असताना, या उपक्रमाने मात्र हिंदू-मुस्लिम ऐक्याचे जिवंत उदाहरण समोर आणले. भारत हा कृषीप्रधान देश असून गाईला येथे विशेष धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व आहे. याच पार्श्वभूमीवर गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्यात यावे, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने नुकतीच जिल्हा प्रशासनाकडे केली होती. त्या मागणीला अधिक बळ देण्यासाठी ईदच्या दिवशी गोशाळेत चारा वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना साहेबान जहागीरदार म्हणाले की, राज्य सरकारने लागू केलेल्या गोहत्या बंदीच्या नियमांचे पालन मुस्लिम समाज पूर्ण जबाबदारीने करत आहे. संपूर्ण देशभरात मुस्लिम समाजाने गोवंश जनावरांची कुर्बानी केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. गाय ही हिंदू बांधवांच्या श्रद्धेचा विषय असून कृषी संस्कृतीचेही प्रतीक आहे. त्यामुळे केंद्र सरकारने गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्याचा गंभीरपणे विचार करावा.

ते पुढे म्हणाले की, गोहत्या किंवा गाईच्या नावावरून मुस्लिम समाजाविषयी चुकीचे समज निर्माण करण्याचे प्रकार थांबले पाहिजेत. अफवा पसरवून दोन समाजांमध्ये द्वेष निर्माण करण्यापेक्षा एकात्मता, प्रेम आणि परस्पर आदर वाढविण्यासाठी समाजाने पुढे येण्याची गरज आहे. हिंदू-मुस्लिम समाज एकत्र राहिला तरच देश अधिक मजबूत होईल.

मौलाना शफिक कासमी यांनीही ईदच्या दिवशी पार पडलेल्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, इस्लाम धर्म मानवतेचा, दयाळूपणाचा आणि सहअस्तित्वाचा संदेश देतो. समाजात शांतता आणि बंधुभाव टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे शहरात धार्मिक सलोखा आणि सामाजिक ऐक्याचा सकारात्मक संदेश पोहोचला असून, अनेक नागरिकांनी या पुढाकाराचे स्वागत केले आहे.



मुस्लिम समाजाची ईदगाह मैदान, कोठला येथे बकरी ईद (ईद उल अज्हा) निमित्त झालेली सामूहिक नमाज.

# शहरात बकरी ईद उत्साहात साजरी, शांतता व राष्ट्रीय एकात्मतेची प्रार्थना

नगर – शहरासह जिल्ह्यात मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद (ईद उल अज्हा) २८ मे रोजी उत्साहात साजरी केली. शहरातील ईदगाह मैदान येथे सकाळी ९:३० वाजता ईदची नमाज मौलाना नदिम अख्तर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी शहरातील मुस्लिम बांधव उपस्थित होते.

नमाजच्या प्रारंभी धार्मिक व्याख्यान, नमाजनंतर खुदबा व त्यानंतर मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. देशात शांतता, समृध्दी व राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रार्थना करण्यात आली. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील विविध मशिदी मधून बकरी ईदची नमाज अदा करण्यात आली. ईदनिमित्त प्रमुख नमाज पठण कोठला येथील ईदगाह मैदानात झाले. मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या भेटी-गाठी घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. तर कुर्बानी करताना इतर धर्मियांना त्रास होणार नाही आणि गोवंश जनावरांची कुर्बानी न करण्याच्या समाजबांधवांना विशेष सूचना करण्यात आल्या.

पोलीस प्रशासनाच्या वतीने खबरदारी म्हणून ईदगाह मैदानसह शहरातील चौका-चौकात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोठला येथून जाणारी वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळविण्यात आली होती. नमाजनंतर शहरातील विविध कब्रस्तान व दर्गामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. बकरी ईद निमित्त तीन दिवस म्हणजे गुरुवार पासून शनिवार पर्यंत घरोघरी कुर्बानी केली जाणार आहे.



केडगाव येथील शाही जामा मस्जिदमध्ये ईद-उल-अजहानिमित्त नमाज अदा करताना मुस्लिम बांधव (छाया – समीर मन्यार)

# केडगावच्या शाही जामा मस्जिदमध्ये बकरी ईद उत्साहात

नगर – केडगाव येथील शाही जामा मस्जिदमध्ये बकरी ईद (ईद-उल-अजहा) उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. ईदनिमित्त विशेष नमाज पठण करण्यात आले. नमाजानंतर देशात शांतता, सामाजिक ऐक्य, बंधुभाव तसेच सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

मौलाना यांनी ईद-उल-अजहाचे धार्मिक महत्त्व सांगताना त्याग, मानवता आणि सेवाभावाचा संदेश दिला. समाजात प्रेम, सलोखा आणि परस्पर सहकार्य टिकवून ठेवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. नमाजानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना मिठी मारून ईदच्या शुभेच्छा दिल्या. लहान मुलांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण दिसून. परिसरात स्वच्छता व शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले होते. ईदनिमित्त विविध ठिकाणी गोरगरिबांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकीही जपण्यात आली. यावेळी केडगाव परिसरातील नागरिक, ज्येष्ठ मंडळी, युवक तसेच मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# साई सेवा पतसंस्थेच्या संचालक मंडळाकडून ठेवीदारांची २ कोटी ५३ लाखांची फसवणूक

नगर – श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील साई सेवा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. आणि संबंधित मल्टीस्टेट संस्थांमधील ठेवीदारांची तब्बल २ कोटी ५३ लाख ९८ हजार ६८१ रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी चेअरमन, व्हाईस चेअरमन सर्व संचालक आणि व्यवस्थापक अशा २१ जणांविरोधात श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार बेकायदेशीर ठेव योजना प्रतिबंधक कायदा तसेच बीएनएसच्या विविध कलमांखाली हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

संस्थेचे चेअरमन ज्ञानदेव सोनबा पाचपुते, व्हाईस चेअरमन उत्तम वसंतराव मोरे, संचालक – मोहन ज्ञानदेव धगाटे, अशोक तुकाराम भोसले, चंद्रशेखर पोपटराव काळे, भगवान नारायण सोनवणे, संतोष नारायण जाधव, गोकुळ अरुण कंदलकर, राहुल बाबूराव जगताप, चंद्रशेखर शिवाजीराव मोरे, बाळासाहेब संभुदेव पाचपुते, किरण निंळकंठ कुलकर्णी, जालिंदर सोनबा पाचपुते, संतोष जगताप, नाना मारुती सुपनर, संचालिका सुनंदा अरुण डोईफोडे, सुनिता भानुदास बांदल, तारामती नाना सुपनर, सुभद्रा नारायण जाधव, सुनिता बाळासाहेब काळे व मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश अरुण डोईफोडे अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

काष्टी येथील मुख्य शाखा, श्रीगोंदा आणि इतर उपशाखांमधील ठेवीदारांनी बचत खाते, मुदत ठेव व फिक्स डिपॉझिटच्या माध्यमातून भविष्यासाठी बचत केली होती. संस्थेकडून १२ टक्के आकर्षक व्याजदराचे आमिष दाखवून विविध ठेव व गुंतवणूक योजना राबवण्यात येत होत्या. मात्र मुदत पूर्ण झाल्यानंतर ठेवी परत न मिळाल्याने ठेवीदारांनी न्यायालयात धाव घेतली.

दाखल फिर्यादीनुसार, सन २०२० ते २५ मे २०२६ या कालावधीत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी अधिक व्याजदराचे आमिष दाखवून ठेवीदारांचा विश्वास संपादन केला आणि जमा केलेली रक्कम स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापरून अपहार केल्याचा आरोप आहे.पैसे काढण्यासाठी गेलेल्या ठेवीदारांना विविध कारणे सांगून टाळाटाळ करण्यात आली, तसेच रक्कम देण्यास नकार देण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणात तीन स्वतंत्र फौजदारी तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. न्यायालयाच्या आदेशानंतर संबंधित संस्थांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक किरण शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

### लेखापरीक्षणावरही संशय व्यक्त

दोन्ही संस्थांचे संचालक आणि व्यवस्थापन जवळपास एकच असल्याने गुन्हा दाखल होताच संबंधित पदाधिकारी गायब झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. यापूर्वीच्या लेखापरीक्षणावरही संशय व्यक्त केला जात आहे. लेखापरीक्षणात अनियमितता दडपल्याचा आरोप होत असून, सहकार विभागाला चुकीची माहिती देण्यात आल्याचे बोलले जात आहे. सध्या सुरू असलेल्या चाचणी लेखापरीक्षणातून आणखी मोठे आर्थिक घोटाळे उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या कर्तृत्वाचा, विकासाचा अंगीकार करून त्यांची 'गरिमा' जपण्याची गरज

**शहराच्या ५३६ व्या स्थापना दिनानिमित्त जयंत येलुलकर यांचे प्रतिपादन**

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव आपल्या शहराला आहे ही अभिमानाची, शहराच्या गौरवाची गोष्ट असून या नावाची गरिमा जपण्यासाठी अहिल्यादेवींनी राज्य कारभार करताना रयतेच्या कल्याणासाठी आपले योगदान दिले हाच आदर्श जपत शहराच्या सर्वांगीण विकासात भर पडावी, हे राजधानीचे शहर भविष्यात विकासाच्या बाबतीत राज्याचे मानबिंदू ठरावे असे प्रतिपादन रसिक ग्रुपचे अध्यक्ष व माजी नगरसेवक जयंत येलुलकर यांनी केले. ऐतिहासिक अहिल्यानगर शहराच्या ५३६ वा स्थापना दिनानिमित्त ते बोलत होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील चोंडी येथे जन्म झाला. होळकरांच्या इंदोर संस्थानचा राज्यकारभार पुण्यश्लोक अहिल्या देवींनी आदर्शरित्या साभाळला.

सामान्य जनतेसाठी अहिल्यादेवींनी देशात विविध ठिकाणी धर्मशाळा बांधल्या. मंदिरे बांधली, मंदिरांचा जीर्णोद्धार केला, नद्या स्वच्छ करीत त्या रुंद केल्या, घाट, बंधारे बांधले, रस्ते निर्माण केले व खऱ्या अर्थाने रयतेच्या सुखासाठी कार्य करतांना देशात प्रेरणा निर्माण केली स्त्रियांच्या हितासाठी विविध निर्णय घेताना त्यांच्या सुखदुःखाकडे लक्ष दिले ही आपल्यासाठी गौरवाची बाब आहे.

आज जिल्ह्याला त्याचं नाव आहे, त्यांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार येथील प्रमुख राजकीय धुरिणांनी या जिल्ह्याचा सर्वांगीण विकास केला तर देशात आपल्या जिल्ह्याचे नाव कौतुकाने घेतले जाईल व अहिल्या नावाची गरिमा खऱ्या अर्थाने जपली जाईल. तरच अहिल्यानगर नाव सार्थकी लागेल. आपल्या जिल्ह्यातील राजकीय नेत्यांची नक्कीच क्षमता आहे की ते विकासाच्या बाबतीत जिल्ह्याचे नाव देश पातळीवर घेऊन जाऊ शकतात. एकेकाळी होळकरांचे प्रमुख संस्थान असलेले इंदोर शहर स्वच्छतेच्या बाबतीत गेल्या काही वर्षांपासून देशात प्रथम क्रमांकावर आहे. देश परदेशातील पर्यटक या शहराच्या विकास, स्वच्छतेच्या बाबतीत भरभरून बोलतात. त्याचप्रमाणे अहिल्यादेवींचे हे शहर समृद्ध व्हावे. इथली ऐतिहासिक सीना नदी आज अतिशय वाईट स्थितीत आहे. एकेकाळी आपल्या रुंद पात्राने दुथडी भरून वाहणाऱ्या या पवित्र नदीचे अक्षरशः गटारात रूपांतर झाले असून पात्राचे रुंदीकरण करून नदी किनारी सुशोभीकरण केल्यास नदीला तिचे पुनर्वैभव प्राप्त होऊन शहराच्या सौंदर्यात देखील भर पडून अहिल्या देवींचे नाव खऱ्या अर्थानं सार्थकी लागेल. आपल्या शहराची भौगोलिक दृष्ट्या वाढ होत असून उपनगरे विकसित होत आहेत. शहर, उपनगरातील ठिकाणी स्त्रियांसाठी स्वच्छतागृह असणे महत्वाचे असून नागरिकांची अनेक वर्षांची ही मागणी आहे. याकडे त्वरित लक्ष दिल्यास स्त्रियांचा हा प्रश्न मार्गी लागेल. सध्या शहरामध्ये मजबुत रस्त्यांची निर्मिती करीत असलेले आमदार संग्राम जगताप, महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे व महापालिका प्रशासनास नगरकर धन्यवाद देतील.

जिल्ह्याला नाव दिलं म्हणजे कायापालट झाला असे नव्हे तर पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जगमान्य कर्तृत्वाचा, विकासाभिमुख दृष्टीचा अंगीकार केला तरच त्यांच्या नावाला खरे अभिवादन ठरेल हे नाव सार्थ ठरेल असा विश्वास येलुलकर यांनी व्यक्त केला. आपला जिल्हा सहकारातील आहे, मोठमोठी कर्तृत्ववान राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तिमत्वे येथे होऊन गेली आहेत आपली परंपरा मोठी आहे. भारतातील सहकारातील पहिला साखर कारखाना निर्माण करीत पद्मश्री कै.विठ्ठलराव विखे पाटील यांनी इतिहास निर्माण केला आहे. ही परंपरा लक्षात घेऊन विकासाच्या ध्यासाने व अहिल्यादेवीच्या स्वप्नातील शहर साकार करायचे असेल तर नगरकर हे सहज करू शकतात. जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून ऐतिहासिक भुईकोट किल्ला राष्ट्रीय स्मारक होण्यासाठी प्रयत्न करावेत असेही येलुलकर म्हणाले. शहराच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने शुभेच्छा देतांना त्यांनी या भावना व्यक्त केल्या.



राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेसाठी विराज पिसाळची निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

# राष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धासाठी विराज पिसाळ याची निवड

नगर – जेजुरी येथे तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत एकलव्य तायक्वांदो ॲकॅडमीचा खेळाडू विराज पिसाळ याने ५४ किलो वजन गटामध्ये सुवर्णपदक मिळवून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शिक्कामोर्तब केले. या पदाकामुळे त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. उत्तम कामगिरी करत त्याने तायक्वांदो खेळासाठी अहिल्यानगरच्या शिरापेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या निवडीबद्दल त्याचे तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफ्फर पठाण, खजिनदार प्रसाद कुलकर्णी, उपाध्यक्ष घनश्याम सानप यांनी अभिनंदन केले.

विराजला प्रशिक्षक गणेश वंजारे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच ग्रँडमास्टर अल्ताफ खान, योगेश बिचीतकर, सचिन मरकड, मंगेश आहेर यांचे देखील मार्गदर्शन लाभले.

मणिपूर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन अहिल्यानगरचे अध्यक्ष घनश्याम सानप, सचिव गणेश वंजारे, खजिनदार धर्मनाथ घोरपडे यांनी विराजला राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

